रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३००
www.ramprahar.com

शुक्रवार, १९ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ...तर अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई : मुख्यमंत्री



**मुंबई** : राजधानी मुंबईतील सुमारे २२०० किलोमीटर लांबीच्या नाल्यांची सफाई व्यवस्थित आणि खोलपर्यंत केल्यास यंदा पावसाळ्यात पाणी साचण्यापासून मुंबईकरांना होणारा त्रास वाचेल. त्यामुळे किती मेट्रिक गाळ काढला यापेक्षा मुंबईत पाणी कुठे तुंबणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यांनी मुंबईतील नालेसफाईच्या कामांचा प्रत्यक्ष जागेवर जात आढावा घेतला. यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दरवर्षी पावसाळ्यात मुंबईकरांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यंदा त्यांना हा त्रास करावा लागू नये, म्हणून नालेसफाई चांगली झाली पाहिजे. जे अधिकारी चांगले काम करतील त्यांचा सन्मान केला जाईल, पण जे अधिकारी कर्तव्य पार पाडणार नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.

## अंतरंग

थेरोंड्याच्या खंडोबा मंदिरातील चांदीच्या मूर्तींची चोरी/२

कामोठे येथून आठ बांगलादेशींना अटक/६

राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अमृता भगतला कांस्यपदक/८

### सागर परिक्रमेच्या पाचव्या चरणाचा शुभारंभ

# मच्छीमारांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध

### केंद्रीय मंत्री परषोत्तम रुपाला यांची ग्वाही



**उरण : रामप्रहर वृत्त**

आपल्या देशाला लांबच लांब समुद्रकिनारे लाभले आहेत. या सामुद्रिक संपत्तीवर उपजीविका करणाऱ्या आमच्या मच्छीमार बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य शासन कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायमंत्री परषोत्तम रुपाला यांनी येथे दिली. सागर परिक्रमा कार्यक्रम २०२३ अंतर्गत पाचव्या चरणाचा शुभारंभ बुधवारी (दि. १७) उरण तालुक्यातील करंजा जेटी येथून झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, केंद्रीय मंत्री महोदयांच्या पत्नी श्रीमती रूपाला, केंद्रीय मंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी अभिलाष लेखी, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. अतुल पाटणे, सहसचिव डॉ. जे. बालाजी, पंकज कुमार, भारतीय तटरक्षक दलाचे डीआयजी अनुराग कश्यप, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त महेश देवरे, सहाय्यक आयुक्त संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास माल्यार्पण करून झाले.

सर्वप्रथम केंद्रीय मंत्री रुपाला यांनी मच्छीमार बांधवांनी, माता-भगिनींनी केलेल्या उत्स्फूर्त स्वागताबद्दल सर्वांचे आभार मानून म्हटले की, केंद्र शासन मच्छीमार बांधवांच्या समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. मच्छीमारांसाठी केंद्र शासनाने पंतप्रधान मत्स्यसंपदा योजना सुरू केली आहे, त्याचा लाभ सर्व मच्छीमार बांधवांनी जरूर घ्यावा.

या सागर परिक्रमा कार्यक्रमांतर्गत मच्छीमार बांधव, त्यांच्या सर्व संघटना यांच्याशी संवाद साधल्यानंतर त्यांच्या ज्या समस्या, जे प्रश्न, त्यांच्या मागण्या समोर येतील त्या समस्यांची आणि शासनाच्या योजनांची व धोरणांची योग्य ती सांगड घालण्यात येईल. त्यात ज्या काही सुधारणा आवश्यक आहेत त्या निश्चित केल्या जातील, असे आश्वासन केंद्रीय मंत्री रुपाला यांनी या वेळी दिले.

भारताचे पहिले आरमार उभे करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीस नमन करून केंद्रीय मंत्री रुपाला यांनी अनेक वर्षे भारतीय नौदलाच्या ध्वजावर असलेले ब्रिटिश राजवटीचे चिन्ह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बदलून त्या जागी छत्रपती शिवरायांच्या राजमुद्रेचे चिन्ह प्रदर्शित करण्याचा निर्णय समस्त भारतीयांचा अभिमान उंचावणारा असल्याचे नमूद केले.

केंद्र शासनाने चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पात मच्छीमार बांधवांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून तब्बल सहा हजार कोटी रुपयांची अधिकची तरतूद उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री रुपाला यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कौतुक केले. मुख्यमंत्री शिंदे यांनी मनोरी येथील मच्छीमार बांधवांना नुकसानभरपाई म्हणून आर्थिक मदतीसंदर्भात अत्यंत संवेदनशीलतेने व तत्परतेने घेतलेल्या निर्णयाबाबतचा उल्लेख करून केंद्रात संवेदनशील निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात तसेच काम करणारे मुख्यमंत्री असल्यावर समस्त जनतेचे भले होणारच, देशाचा सर्वांगीण विकास होणारच, असा विश्वास व्यक्त केला.

पालकमंत्री उदय सामंत यांनी आपल्या मनोगतात केंद्रीय मंत्री परषोत्तम रूपाला हे मच्छीमार बांधवांना अशा प्रकारे थेट भेट देणारे आणि त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधणारे पहिलेच केंद्रीय मत्स्यव्यवसायमंत्री असल्याचे सांगितले व त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश बालदी, केंद्रीय मंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी अभिलाष लिखी, पंकजकुमार, करंजा मच्छीमार सहकारी सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनीही मनोगत व्यक्त केले.

### शासनाकडे प्रस्ताव सादर करा -मंत्री उदय सामंत

**राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री सामंत म्हणाले की, आपल्या मच्छीमार बांधवांमधील पारंपरिक व अपारंपरिक हा भेदभाव मिटविणे आवश्यक आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाकडे मच्छीमार बांधवांच्या हिताचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घ्यायला हवी, असे सांगून केंद्रीय मंत्री मच्छीमार बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिकेत आहेत. अशा वेळी त्यांच्या आवाहनाला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देऊन मच्छीमारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.**




# मोदी सरकारची कामे सामान्य जनतेपर्यंत न्या

### भाजप अध्यक्ष नड्डा यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे संपूर्ण जगात भारताची प्रतिमा उंचावली आहे. पायाभूत सुविधांना वेग देण्याबरोबरच सामान्य माणसासाठी अनेक कल्याणकारी योजना मोदी सरकारने सुरू केल्याने सामान्य माणसाच्या जीवनमानात बदल घडला आहे. ही कामे सामान्य माणसापर्यंत नेऊन निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी कटिबद्ध व्हा, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी गुरुवारी (दि. १८) पुणे येथे केले. ते भाजप प्रदेश कार्यसमिती बैठकीच्या समारोप सत्रात बोलत होते.

व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, तरुण चुघ, राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर, सुनील देवधर, वन व सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार, वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

### उसने बळ घेऊन वाघ बनता येत नाही -उपमुख्यमंत्री फडणवीस

वाघ दोन प्रकारचे असतात. एक सर्कशीतला आणि दुसरा जंगलाचा. जंगलचा राजा व्हायचे असेल तर स्वतःचे बळ लागते. उसने बळ घेऊन वाघ बनता येत नाही, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना या वेळी लगावला. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार शरद पवार यांच्या 'लोक माझे सांगाती' या पुस्तकाचा संदर्भ वाचून ठाकरेंवर टीका केली. कर्नाटक पॅटर्न महाराष्ट्रात चालणार नाही, देशात फक्त मोदी पॅटर्न चालणार, असेही ते म्हणाले.

भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या कामांनी ब्रिटनला मागे टाकत भारत जगातील पाचवी अर्थव्यवस्था बनला आहे. त्यामुळेच भारताकडे पाहण्याचा जगाचा दृष्टिकोन बदलला आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### प. बंगालमधील 'द केरला स्टोरी'वरील बंदी उठवली

**कोलकाता** : सुदिप्तो सेन दिग्दर्शित 'द केरला स्टोरी' या चित्रपटावर पश्चिम बंगालमध्ये घालण्यात आलेली बंदी सर्वोच्च न्यायालायने उठवली आहे. पश्चिम बंगाल राज्य सरकारने काढलेला बंदीचा आदेश न्यायालयाने स्थगित केला आहे. या चित्रपटावर बंदी का, असा सवाल या वेळी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी उपस्थित करीत ममता सरकारले फटकारले.

### तुळजाभवानी मंदिरातील ड्रेसकोडचा निर्णय मागे

**तुळजापूर** : महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात तोकडे कपडे घालणाऱ्या नागरिकांना प्रवेश दिला जाणार नाही, असा निर्णय मंदिर प्रशासनाद्वारे घेण्यात आला होता. याबाबतचे फलक मंदिर परिसरात लावण्यात आले होते, मात्र प्रवाशांच्या प्रतिक्रियांमुळे मंदिर प्रशासनाने ड्रेसकोडबाबतचा आपला निर्णय काही तासांमध्येच मागे घेतला आहे.

# युवा वॉरियर्स कबड्डी लीगचे शानदार उद्घाटन

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या युवा वॉरियर्स कबड्डी लीग स्पर्धेच्या निमित्ताने जपान विरुद्ध पनवेल असा प्रेक्षणीय सामना रसिकांना अनुभवयास मिळाला.

समाजसेवेबरोबरच क्रीडा क्षेत्राला महत्त्व देणारे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत कामोठ्यात युवा वॉरियर्स कबड्डी लीग ही विद्युत प्रकाशझोतातील स्पर्धा खेळली गेली. या स्पर्धेचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १७) झाले. स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत उपक्रमाला तसेच परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या प्रारंभी जपान विरुद्ध पनवेल या प्रेक्षणीय सामन्याने रंगत आणली.

- **लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा**
- **जपान विरुद्ध पनवेल प्रेक्षणीय सामना रंगला**

कामोठे सेक्टर ६मधील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या प्रांगणात युवा वॉरियर्स कबड्डी लीगचा दम घुमला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, **(पान २ वर..)**

### सर्जा-राजा झोकात धावणार!

## बैलगाडा शर्यतीला सर्वोच्च न्यायालयाची परवानगी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



बैलगाडा शर्यतीला सर्वोच्च न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. त्यामुळे बैलगाडा मालक, प्रेमी आणि शौकीन यांनी जल्लोष साजरा केला. यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा महाराष्ट्राचा आणि शेतकऱ्यांचा विजय आहे, असे म्हटले आहे.

महाराष्ट्रात बैलगाडा शर्यत, तामिळनाडूमध्ये जल्लीकट्टू आणि कर्नाटकमध्ये कम्बाला या खेळांसाठी संबंधित तिन्ही राज्य सरकारांनी वन्यजीव संरक्षण कायद्यात काही सुधारणा केल्या होत्या. त्यानुसार या राज्यांनी त्या खेळांना मान्यताही दिली होती, मात्र राज्य सरकारच्या या निर्णयांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या संदर्भात सविस्तर सुनावणी घेऊन डिसेंबरमध्ये हा निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला होता. अखेर गुरुवारी (दि. १८) याचा निकाल आला आणि राज्य सरकारांनी पारित केलेल्या कायद्यांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या संदर्भातील कायद्यात सुधारणा करण्याचा राज्य सरकारांचा अधिकार न्यायालयाने मान्य केला आहे.

# फणसाड अभयारण्यात मुबलक पाणीसाठा

### विविध उपाययोजनांमुळे वन्यजीवांची संख्या वाढली







**फणसाड अभयारण्यात मुबलक प्रमाणात पाणी असल्यामुळे बिबट्या, सांबर, रानगवा यांच्या संख्येत वाढ झाली आहे. या अभयारण्यात नुकतेच इजिप्शियन व्हल्चर (गिधाड) आढळले असून त्याचे वास्तव्य या ठिकाणी वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.**

**-तुषार काळभोर, वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड अभयारण्य**

**मुरूड : संजय करडे**

सध्या वातावरणात मोठा बदल झाला असून उन्हाची तीव्र किरणे जमिनीवर पडू लागल्याने भूतलावरील तापमानात मोठी वाढ झाली आहे. एप्रिल-मे महिन्यात तापमान सध्या ३६ अंश सेल्सियसपेक्षा जास्त असल्याने लोकांना घामाच्या धारा लागल्या आहेत. अशा कडक उन्हात वन्यजीवांनाही मुबलक पाणी मिळावे यासाठी फणसाड अभयारण्य प्रशासनाने विविध उपाययोजना करून सोय उपलब्ध करून दिली आहे.

फडणसाड अभयारण्यात साग व निलगिरीची उंच व भली मोठी झाडे असल्याने कडक उन्हातही या भागात दाट सावली असते. पक्ष्यांच्या १९० प्रजाती या ठिकाणी आढळतात. घुबड, तुरेवाला सर्पगरुड, ससाणा, सफेद पाठीची गिधाडे, सातभाई, बुलबुल, हळद्या तांबट, खंड्या, खाटीक, सुभग, नीलपंख, स्वर्गीय नर्तक, सुतार, महाराष्ट्राचे मानचिन्ह असलेले हरियाल, कोकीळ यासारखे रंगीबेरंगी पक्षी येथे वास्तव्यास आहेत, तर रानससा, सांबर, भेकर, पिसोरी, साळींदर, रानडुक्कर, मुंगूस, कोल्हा, माकड, रानमांजर, बिबट्या आदी वन्यजीव मोठ्या संख्येने आहेत. **(पान २ वर..)**

## 'त्या' लिपिकाला पोलीस कोठडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या रायगड जिल्हा शल्यचिकित्सकांच्या लिपिकाला अलिबाग न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. सुहास माने रजेवर गेले आहेत. रजेवर जाताना त्यांनी आपला पदभार अतिरीक्त जिल्हा शल्यचिकीत्सकांकडे न सोपविता निवासी आरोग्य अधिकाऱ्यांकडे सोपवला आहे.

पोलीस भरती झालेल्या १५ महिला उमेदवारांकडे प्रदीप ढोबळ यांनी प्रत्येकी १५०० रुपयांची मागणी केली होती. रक्कम न दिल्यास वैद्यकीय चाचणीत अपात्र ठरण्याची भीती दाखवून त्यांनी एकूण २१ हजार ५०० रुपयांची रक्कम या महिला उमेदवारांकडून उकळली होती.

# रायगडात खरीप हंगामाचे नियोजन

### ९८ हजार हेक्टरवर होणार भात लागवड

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**



यंदाच्या खरीप हंगामात रायगड जिल्ह्यात ९८ हजार ३६ हेक्टरवर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे, तर तीन हजार ३७ हेक्टरवर नाचणीची लागवड केली जाणार आहे.

रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हा नियोजन भवन येथे झाली. त्या वेळी ही माहिती देण्यात आली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे खरीप हंगाम नियोजनाची माहिती दिली.

खरीप हंगामातील भातपिकासाठी ९८ हजार ३६ हेक्टर क्षेत्रावर नियोजन करण्यात आले असून तीन हजार १७६ किलोग्रॅम प्रतिहेक्टर उत्पादनाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. खरीप हंगामातील नाचणी पिकासाठी तीन हजार ३७ हेक्टर क्षेत्रावर नियोजन असून एक हजार ३२२ किलोग्रॅम प्रतिहेक्टर उत्पादनाचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

या हंगामातील भातपिकासाठी १७ हजार ४५० क्विंटल बियाणांची, नागली पिकासाठी १५० क्विंटल बियाणांची, तूर पिकासाठी ८५० क्विंटल बियाणांची, मूग पिकासाठी ५५ क्विंटल बियाणांची, भाजीपाला व इतर पिकासाठी १७५ क्विंटल बियाणांची, उडीद पिकासाठी ९० क्विंटल बियाणांची अशी एकूण १९ हजार ४०० क्विंटल बियाणांची गरज असून १० मे अखेर आठ हजार ९४५ क्विंटल भात बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे.

या वर्षासाठी १७ हजार ४६० मेट्रिक टन खतांची मागणी असून आतापर्यंत एक हजार १६० मेट्रिक टन पुरवठा करण्यात आला आहे.

# भाजपचे महाजनसंपर्क अभियान यशस्वी करा

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यसमिती बैठकीत आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ३० मे रोजी नऊ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त मोदी सरकारची विकासकामे, कल्याणकारी योजना मतदारांपर्यंत नेण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे महाजनसंपर्क अभियान सुरू करण्यात येणार आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकदीने प्रयत्न करावेत, असे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. १८) केले.



पुणे येथे भाजप प्रदेश कार्यसमिती बैठकीत ते बोलत होते. भाजप राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी, केंद्रीय मंत्री नारायण राणे, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे शहर अध्यक्ष जगदीश मुळीक, केंद्रीय व राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, प्रदेश पदाधिकारी, खासदार, आमदार आदी या वेळी उपस्थित होते.

बावनकुळे यांनी सांगितले की, महाजनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून मोदी सरकारची अनेक विकास कामे पक्ष संघटनेमार्फत सामान्य माणसापर्यंत पोचवायची आहेत. त्यासाठी बूथ प्रमुखांपासून प्रदेश पदाधिकाऱ्यांनी या अभियानात पूर्ण ताकदीने सहभागी झाले पाहिजे. त्याचबरोबर बूथ सशक्तीकरण अभियान, लाभार्थी संपर्क यासारखे कार्यक्रमही राबविण्यासाठी कार्यसमिती सदस्यांनी प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले.

बावनकुळे यांनी सांगितले की, पक्षाची नवी प्रदेश कार्यकारिणी नुकतीच घोषित झाली आहे. जिल्हा व मंडल पातळीपर्यंतच्या नियुक्त्या लवकरच पूर्ण होतील. त्याखेरीज राज्यातील सर्व लोकसभा, विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक प्रमुख नियुक्त केले जाणार आहेत. नव्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाने दिलेल्या कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करायची आहे.

त्याआधी बावनकुळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून बैठकीला प्रारंभ झाला.

# थेरोंड्याच्या खंडोबा मंदिरातील चांदीच्या मूर्तींची चोरी; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

थेरोंडा खंडेरावपाड्यातील भरवस्तीत असलेल्या खंडोबा मंदिरातील पाच किलो ३६० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या मूर्ती अज्ञात चोरट्याने बुधवारी (दि. १७) रात्रीच्या वेळी लंपास केल्या. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञातांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.





गुरुवारी पहाटे पूजाअर्चा करण्यास गेलेल्या ग्रामस्थांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर तत्काळ रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंद्रविण्यात आली. थेरोंडा खंडेरावपाडा मंदिरात असलेल्या लाकडी देव्हाऱ्यात ५० वर्षांपूर्वीच्या चांदीच्या मूर्ती, तांब्याचा मुलामा व चांदीचा लोलक असे एकूण पाच किलो ३६० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या मूर्ती होत्या. या सर्व मूर्तींची चोरी झाल्याची तक्रार गोरखनाथ लक्ष्मण नवरीकर यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिली आहे.

घटनास्थळी रेवदंडा पोलीस निरिक्षक देवीदास मुपडे तत्काळ हजर झाले. घटनेचे गांभिर्य व कोळी समाजाच्या भावना लक्षात घेऊन अलिबाग गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक देवानंद गावडे यांनीही घटनास्थळी लागलीच धाव घेतली. तेथील ग्रामस्थांचा जबाब घेऊन पंचनाम्यास सुरुवात करण्यात आली. या वेळी स्थानिक ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. अधिक तपास रेवदंडा पोलीस निरिक्षक देविदास मुपडे हे करीत आहेत.

पर्वतवासी श्री दत्त मंदिर चौल भोवाळे येथील मंदिरातील गाभार्यातील चांदीची प्रभावळ चोरीस गेल्याची घटनेचा तपास लागण्यापूर्वीच थेरोंडा येथे भरवस्तीत असलेल्या खंडोबा मंदिरातील चांदीच्या मूर्तीची चोरीची घटना घडल्याने परिसरात संप्तत प्रतिक्रिया उमटत आहेत.

# ऐतिहासिक निकाल बळीराजाला समर्पित –आमदार महेश लांडगे

**पिंपरी : प्रतिनिधी**

देशातील शेतकरी, बळीराजाच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बैलगाडा शर्यतींवरील बंदी पूर्णत: उठवण्याचा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. हा निकाल शेतकरी, भूमिपूत्र आणि गाडामालकांसह बळीराजाला समर्पित आहे, अशा भावना भाजप शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.



बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. वर्षभरापूर्वी न्यायालयाने बैलगाडा शर्यतींना सशर्त परवानगी दिली, मात्र पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर अंमित सुनावणी सुरू होती. महाराष्ट्रातून बैलगाडा शर्यतीसाठी जनआंदोलन उभारण्यासाठी अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या माध्यमातून आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे राज्य सरकारने बैलगाडा शर्यत सुरू करण्याबाबत विधिमंडळात कायदा तयार केला होता, तसेच बैलांच्या पळण्याच्या क्षेमतेबाबत 'रनिंग बिलिटी ऑफ बुल्स' हा अहवाल तयार करण्यासाठी समितीची नेमणूक केली होती. तो अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला. राज्य सरकारच्या कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले आहे.

विशेष म्हणजे, अखिल भारतीय बैलगाडा संघटना आणि महाराष्ट्र राज्य सरकार अशा दोन याचिका सर्वोच्च न्यायालयात होत्या. महाराष्ट्र सरकारच्या वतीने तज्ज्ञ वकीलांची नियुक्ती केली होती. बैलगाडा संघटनांच्या वकीलांचा मोठा खर्चही तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: वैयक्तिक करण्याची भूमिका घेतली होती. गेल्या ११ वर्षांच्या लढ्यानंतर अखेर सर्वोच्च न्यायालयात बैलगाडा शर्यतीवरील बंदी पूर्णत: काढण्यात आली असून, शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा खेळ कायमस्वरुपी सुरू राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे यांनी दिली.

### द्रुतगती मार्गावर अपघात; महिला ठार, दोघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कुंभिवली गावच्या हद्दीत पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर कार क्रॅश बॅरियरला धडकून अपघात झाला. या अपघातात कारमधील महिलेचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले आहेत. मंगलम कंपनीजवळ गुरुवारी (दि. १८) सायंकाळी ७ वा. दरम्यान हा अपघात घडला.

मुंबई येथील जैन कुटुंब पुणे येथे जात होते. कुंभिवली गावच्या हद्दीत गाडीवरील ताबा सुटल्याने कार क्रॅश बॅरियरला धडकली. या अपघातात मिनल जैन यांच्या मृत्यू झाला असून जखमी मानवी जैन व हितेश जैन यांना एमजीएम हॉस्पिटल कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे.

# नशेसाठी कोरेक्सची विक्री करणारी टोळी गजाआड





**पनवेल : वार्ताहर**

मुंब्रा पोलीस स्टेशनच्या परिसरात अमली पदार्थांचा साठा करून खरेदी-विक्री करणाऱ्या पाच जणांना मुंब्रा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून तब्बल नऊ लाख १५ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

**नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कृपाली बोरसे यांना बातमीदाराकडून रशीद कंम्पाउंड, कौसा, मुंब्रा या ठिकाणी एका व्यक्तीच्या घरात चोरीचे मोबाईल व मॅक्सकॉफ कंपनीच्या कफ सिरप बॉटल्स साठवल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी रिजवान चाळ, रुम नंबर ०२ येथे छापा मारला. या ठिकाणी फैयाज फरीद शेख (वय २४) याच्याकडे वेगवेगळ्या कंपनीचे ६२ मोबाईल आढळले, तसेच नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या मॅक्सकॉप कफसिरपच्या ५०२ बॉटल्स आढळल्या. पोलिसांनी त्याला अटक केली. त्याने मोहम्मद शोएब सलीम शेख उर्फ राज (वय २१) याच्यासह मोबाईल चोल्याची माहिती दिली, तसेच हे मोबाईल आरोपी मोहम्मद हन्जला सलीम अन्सारी उर्फ केफ (वय २०) याला विक्री करीत असल्याची माहिती दिल्याने त्यालाही ताब्यात घेण्यात आले. अधिक चौकशीनंतर पोलिसांनी फैसल सलाउद्दीन शेख (वय २०), मोहम्मद अझहर जुबेर शेख (वय ३२) यांनाही ताब्यात घेतले. या आरोपींकडून एकूण ९१ मोबाईल फोन, लॅपटॉप व सॉफ्टवेअर हस्तगत करण्यात आले आहे. आरोपींना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

पान १ वरून

## मोदी सरकारची कामे सामान्य जनतेपर्यंत न्या

कोरोना संकटाचे मोदी सरकारने संधीत रूपांतर केल्याने भारताचा जीडीपी जगात सर्वाधिक वेगाने वाढणारा ठरला आहे. नेपाळ, श्रीलंकायासारख्या अनेक देशांना संकटात मदत करून भारताने आपली नवी ओळख निर्माण केली आहे.

काँग्रेसच्या काळात सीमावर्ती भागातील रस्त्यांसारख्या दळणवळणाच्या सुविधा निर्माण करण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते. मोदी सरकारने सीमावर्ती भागात चौपदरी रस्त्यांचे जाळे निर्माण केल्याने देशाची सुरक्षा मजबूत झाली आहे. देशभर द्रुतगती महामार्ग, चौपदरी रस्ते, महामार्ग यांची कामे मोठ्या वेगाने सुरू आहेत. गेल्या आठ वर्षांत विमानतळांची संख्याही वाढली आहे. वंदे भारतसारखी नवभारताचा चेहरा असणारी रेल्वे सुरू झाली, असेही नड्डा यांनी सांगितले.

नड्डा पुढे म्हणाले की, भाजप हा सत्तेचे राजकारण करणारा पक्ष नाही. कोरोना काळात भाजप कार्यकर्त्यांनी कोट्यवधी जनतेची सेवाभावाने मदत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना सात सूत्रांचे आचरण करण्यास सांगितले आहे. सामान्य माणसाच्या भाजप कार्यकर्त्यांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जनतेशी संवाद ठेवत सेवाभाव वृत्ती जोपासली पाहिजे.

राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांनी संघटनात्मक बाबींविषयी कार्यसमिती बैठकीत मार्गदर्शन केले.

या वेळी पुरंदरचे माजी आमदार अशोक टेकवडे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींनी त्यांचे स्वागत केले.

## युवा वॉरियर्स कबड्डी लीगचे शानदार उद्घाटन

ओबीसी सेल उत्तर रायगड अध्यक्ष राजेश गायकर, भाजप कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, दामोदर चव्हाण, तेजस जाधव, आदित्य भगत, अरुण भगत, नितेश पाटील, भाजप युवा नेते हॅप्पी सिंग, महेंद्र भोपी, भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, व्यापारी आघाडी अध्यक्ष नाना मगदूम, भाजप सरचिटणीस सुशील शर्मा, लीगल सेलचे ॲड. जय पावणेकर, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा पुरुष गटात होत असून विजेत्या संघास २१ हजार १११ रुपये, उपविजेत्यास १५ हजार १११ रुपये, तर तृतीय क्रमांकास ११ हजार १११ रुपये आणि तिन्ही विजेत्या संघांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटनावेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## फणसाड अभयारण्यात मुबलक पाणीसाठा

या अभयारण्यात पक्षी व प्राण्यांसाठी वन तलाव तसेच सहा कृत्रिम बशी तलाव निर्माण करण्यात आलेले आहेत. अभयारण्यात पाण्याचे नैसर्गिक २७ स्त्रोत उपलब्ध आहेत. वन्यजीवांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी बशी तलाव व वन तलावामध्ये चार बोरिंगसुद्धा मारण्यात आलेल्या असून याद्वारे पाणी तलावात टाकले जात आहे तसेच अन्य ठिकाणहूनसुद्धा गाडीच्या सहाय्याने पाणी आणून प्राणी व पक्ष्यांची तहान भागवण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे वन्यजीवांची संख्या वाढली असून पर्यटक व निसर्गप्रेमींकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

# राज्यस्तरीय स्वयंसिद्धा महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण उत्साहात

**अकोला : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, उपसंचालक क्रीडा व युवक सेवा अमरावती विभाग, अमरावती व अकोला जिल्हा स्वयंसिद्धा असोसिएशन, महाराष्ट्र स्वयंसिद्धा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन अकोला जिल्हाधिकारी निमा अरोरा यांच्या हस्ते करण्यात आले. क्रीडा व युवक सेवा अमरावती विभागाचे विजय संतान हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.



या शिबिराचे आयोजक व या प्रशिक्षणाकारिता संपूर्ण अर्थसाहाय्य करणारे महाराष्ट्र कराटे अमॅच्युअर असोसिएशनचे अध्यक्ष अरुण सारवान, महाराष्ट्र कराटे अमॅच्युअर असोसिएशनचे महासचिव वासुदेव वाघ पाटील, आयोजिका तथा प्रमुख, राज्य युवा पुरस्कारार्थी, नागपूर, अमरावती विभाग प्रमुख खुशबू चोपडे, पोरी जरा जपूनच्या विदर्भ साहित्यिका विजया मारोतकर स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे राहुल कडलक, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार, आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा स्वयंसिद्धा कोकण विभागप्रमुख तपस्वी नंदकुमार गोंधळी, ज्युदो क्रीडा प्रकारातील एशियन मेडलिस्ट गेम मॅडलिस्ट तथा कोल्हापूर विभाग प्रमुख सुनिता पाटील, पुणे विभाग प्रमुख निमा काळे, नाशिक विभाग प्रमुख पूनम घुगे, औरंगाबाद विभाग प्रमुख सरिता येलपुल्ला, लातूर विभाग प्रमुख रोहिणी बनसोडे, सुरेखा गिरी आदी उपस्थित होते.

महिलांना ज्युदो, कराटे, योगा, एरोबिक्स, लाठी-काठी, सेल डिफेन्स टेकनिकचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याचबरोबर या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या महिलांना गुड टच, बॅट टच, विविध व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रत्येक जिल्ह्यातून दहा अशा ३६० महिला सहभागी झाल्या होत्या, तसेच २० तज्ज्ञ प्रशिक्षक सहभागी झाले होते. सर्व सहभागी महिलांना मोफत ट्रकसूट व प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रशिक्षणात रायगड जिल्ह्यातील शितल म्हात्रे, स्नेहा मानकर, अश्विनी पारधी, श्वेता खारकर, प्राची कुथे, नेहा जावसेन, प्रिया कुथे, निदिशा वैद्य, श्रावणी राऊत, पोर्णिमा जाधव या महिला सहभागी झाल्या होत्या.

# दिव्यांगांना वार्षिक नऊ हजार पेन्शन

### लाभ घेण्याचे आवाहन

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषदेच्या हद्दीतील नि:समर्थ (अपंग) व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेला आहे. त्या अनुषंगाने खोपोली नगर परिषदेमार्फत शहरातील पात्र दिव्यांग बांधवांना वार्षिक नऊ हजार रु. पेन्शन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन नगर परिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या कायद्यानुसार कलम ३७नुसार राज्यातील नगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांसाठीचा राखीव निधी त्यांच्या वैयक्तिक तसेच सामुहिक योजनांवर खर्च करण्याबाबत राज्य शासनाने निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने खोपोली नगर परिषदेमार्फत शहरातील पात्र दिव्यांग बांधवांना वार्षिक नऊ हजार रु. मात्र पेन्शन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील सर्व दिव्यांग बांधवांनी नगर परिषद कार्यालयात दिव्यांग प्रमाणपत्र, बँक पासबुकची छायांकित प्रत, आधार कार्ड, हयातीचा दाखला इ. सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्याधिकारी यांनी केले आहे.

**CHANGE OF NAME**

**My Old Name was MUNIRA ABDEMANAF BADSHAH, As per Affidavit in front of Executive Magistrate/Notary of Panvel, I have changed My Name to MUNIRA MUNAF BADSHAH Residing at- 64/c, Prince Paradise, Plot No. 125 A, Near Ghodke Hospital, Panvel, Taluka Panvel, Dist. Raigad.**

**MUNIRA MUNAF BADSHAH** (Sd/- New Name)

# पनवेल महापालिकेतर्फे 'शासन आपल्या दारी'

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका शासन आपल्या दारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवित असून गुरुवारी (दि. १८) या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता मुख्यालयात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत हा उपक्रम जनकल्याण कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

शासकीय योजनांची गतिमान अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने शासन आपल्या दारी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आली. या बैठकित कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध विभागांतील सात अधिकाऱ्यांच्या जनकल्याण कक्षाच्या आत्तापर्यंतच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून शासन आपल्या दारी या उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. योजनांचा लाभ पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध प्रसिद्धी माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

महापालिका आपल्या विविध विभागांच्या माध्यमातून सेवा पुरवित असते. यामध्ये प्रामुख्याने बांधकाम कामगार नोंदणी, जन्म-मृत्यु प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, बचतगट, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री मातृत्व योजना, दिव्यांग प्रमाणपत्र योजना, शासकीय कर्मचारी आस्थापनाविषयक प्रलंबित बाबी व सेवानिवृत्तविषयक लाभ देण्यात येतात.

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहीर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/४४२३/प्र.क्र.१५/२०२८/२०२३ दिनांक : १८/०५/२०२३

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government / State Government/Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ , | PMC/CE/१७/२०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सेक्टर- १४, प्लॉट नं. १६अ, दैनिक बाजार कळंबोली येथे पत्र्याचे शेड उभारणे. | १६,८६,०४१/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२३/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### तारा गावाजवळ अपघात; दोघे जखमी

**पनवेल :** तारा गावाच्या हद्दीत गुरुवारी (दि. १८) झालेल्या दोन वाहनातील विचित्र अपघातात दोघे



जण किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल बाजूकडून पेण बाजूकडे निसान गाडी घेऊन चालक जात असताना अचानकपणे मागून आलेल्या मारुती वॅगन-आर गाडीने कट मारून झालेल्या विचित्र अपघातात निसान गाडी पुढे जाऊन उलटली. यामध्ये दोन्ही गाडीमधील एक-एक जण जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ पेण येथील रुग्णालयात नेण्यात आले आहे. दरम्यान, या दोन्ही गाडीचे मोठे नुकसान झाले असून या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमध्ये भिकारी, गर्दुल्ले वाढले

**पनवेल :** रेल्वे स्थानक परिसरात सध्या भिकारी व गर्दुल्ल्यांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषता मध्यरात्रीच्या वेळेस प्रवाशांचा पाठलाग करून त्यांना बळजबरीने थांबवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. दत्ता इन हॉटेलच्या बाजूने पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या झोपडपट्टी समोरील पदपथावर मध्यरात्रीच्या वेळीस नशेचे सेवन करत काही तरुण बसलेले असतात. तसेच येथून जाणाऱ्या एकट्यादुकट्या प्रवाशाला पाहून त्याला अडवले जाते. त्यामुळे या मार्गाचा वापर करणारे प्रवासी भयभीत झाले आहेत, अशी प्रतिक्रिया प्रवाश्यांकडून व्यक्त होत आहे.

### हनुमान मंदिरात अखंड नामजप

**उरण :** तालुक्यातील करंजा कोंढरीपाड्यातील श्री हनुमान



मंदिरात मुर्तीची विटंबणा एका समाजकंटकानी केली होती. त्याबद्दल उरण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झालेला आहे. हनुमान मूर्तीची विटंबणा झाल्यानंतर कोंढरी ग्रामस्थांनी ब्राह्मणांच्या सल्ल्यानुसार १५ मे २०२३ पासून अखंड ॐ श्री हनुमंताय नमः हा जप अखंड चालू केला आहे. त्यानंतर देवाचा आभिषेकही करण्यात येणार आहे. विटंबना करणाऱ्या समाज कंटकावर कोणतेही कारवाई होत नसल्याने उरण तालुक्यातील करंजा कोंढरीपाडा ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे.

### शिवाजी युवक मंडळाचा कार्यक्रम





**पनवेल :** लाईन आळीतील शिवाजी युवक मंडळ याची सालाबादप्रमाणे सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन रायगड जिल्हा शिवसेना सल्लागार रमेश गुडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मंडळाचे सदस्य असलेले कै. दत्ता जाधव यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या. या वेळी मंडळाचे अध्यक्ष संजय मुरकुटे, किरण भेंडे, शिवराज साखरे, निखिल नाईक, योगेश भोमकर, जयवंत जोशी, शेखर म्हात्रे, जतिन भेंडे, विजय टेंबे, विकास भेंडे, राकेश मुरकुटे, दीपक शेटे, राजा साखरे, विकास म्हात्रे आदी उपस्थित होते.

### जेएनपीएच्या सेक्रेटरीपदी मनीषा जाधव

**उरण :** जेएनपीएच्या सेक्रेटरी व वरिष्ठ प्रबंधकपदी मनीषा



जाधव यांची नियुक्ती झाली बंदराच्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत या पदावर पहिल्यांदाच महिला विराजमान झाली आहे. या आधी त्या पर्सनल व इंडस्ट्रियल रिलेशन व्यवस्थापकपदी त्या कार्यरत होत्या. मे अखेरीस जयवंत ढवळे सेक्रेटरी पदावरून निवृत्त झाले. त्या रित्त झालेल्या जागी मनीषा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली त्यांनी या पदाची सूत्रे शुक्रवारी हाती घेतली. जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### मोहोपाड्यात साईभंडारा उत्साहात

**मोहोपाडा :** रसायनीतील श्री साईबाबा मंदिरात पुन्हा



दर गुरुवारी अन्नदान (साईभंडारा) सुरू झाले असून गुरुवारी (दि.१८) दुपारी साईभंडाऱ्याला साईभक्तांनी उपस्थित राहून अन्नदानाचा लाभ घेवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा साईभंडारा पुर्ण मोफत दिला जात असून ज्या साईभक्तांना वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस, आई वडिलांचा स्मृतीदिनानिमित्त अन्नदान करायचे असेल त्यांनी श्री साईबाबा मंदिर कमिटी अथवा मंदिर पुजारी यांच्याकडे संपर्क साधावा, असेही आवाहन श्री साईबाबा मंदिर कमिटीच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी अध्यक्ष ९९६०९४०२४४, उपाध्यक्ष ९८५०७५७१२१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये मान्सूनपूर्व कामांना प्राधान्य

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रांतील मान्सूनपूर्व कामांसंदर्भातील उपाययोजना व आपत्कालीन व्यवस्थापनाबाबतचे नियोजन करण्याबाबत १७ मे रोजी मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी मान्सूनपूर्व कामांचा आढावा तसेच आपत्ती काळातील व्यवस्थापन या विषयांवरती चर्चा करण्यात आली.



## महापालिका मुख्यालयात नियोजन बैठक

आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी, सिडको मुख्य अग्निशमन अधिक्षक विजय राणे, पोलीस निरीक्षक संजय नाळे, पोलिस निरीक्षक प्रमोद पवार, सिडकोचे कार्यकारी अधिकारी अनंत धोंडे, सिडकोचे कार्यकारी अभियंता विलास बनकर, परिवहन विभागाचे ज्ञानेश्वर म्हात्रे उपस्थित, पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.महापालिकेच्या वतीने नालेसफाईची कामे युध्दपातळीवर सुरू आहेत. उर्वरीत कामेही लवकरात लवकर संपवावीत अशा सूचना आयुक्तांनी या वेळी संबंधित विभागास दिल्या. तसेच पांडवकडा भाग पावसाळ्यात धोकादायक असतो. अनेकदा या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता असते म्हणून पावसाळ्याच्या कालावधीत पांडवकडा भाग नागरिकांसाठी बंद ठेवण्याच्या दृष्टीने फलक लावण्याय यावेत. तसेच त्याठिकाणी पोलीस विभागानेही महापालिकेला सहकार्य करावे, अशी विनंती आयुक्तांनी केली.

चारही प्रभागातील मॅन होल दुरूस्त करावेत, नागरिकांनीही त्या त्या प्रभागामधील नादुरूस्त मॅन होलच्या तक्रारी संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांकडे कराव्यात. या तक्रारींवरती महापालिका अधिकाऱ्यांनी तात्काळ उपाय योजना कराव्यात अशा सुचना या वेळी आयुक्तांनी दिल्या.

पालिका हद्दीतील सिडकोभागातील मान्सून पूर्वकामे ही सिडको विभागाने पूर्ण करावीत. महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळयावेळी सिडकोमार्फत तयार करण्यात आलेला तात्पुरता रस्ता काढून टाकण्याबाबत सिडको अधिकाऱ्यांना आयुक्तांनी सूचित केले.

धूर फवारणी व जंतूनाशके फवारणी यंत्रणा सज्ज करावी. कळंबोली होल्डींग पॉंड येथील पाण्याचा निचरा होण्यासाठी पंपिग मशीनची व्यवस्था करणे. मान्सूनपूर्व करावयाची विद्युत विभागाची कामे, धोकादायक स्थितीत झाडांची, फांद्यांची छाटणी करणे, धोकादायक इमारतीची पाड कामे पूर्ण करणे.

कळंबोली येथील नाल्यांमधून टाकण्यात आलेल्या विद्युत वाहिन्या तात्काळ अन्य ठिकाणी स्थलांतरण करून घेणे, व केबल्समध्ये येणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे, धोकादायक स्थितीत असलेले विद्युत खांब व डिपी स्थलांतरण करण्याच्या सूचना आयुक्तांनी विद्युत महामंडळास केल्या. तळोजा येथील अंडरपासमध्ये दरवर्षी पावसाळ्यातील पाणी साठण्याची समस्या उदभवते, हा भाग रेल्वे प्रशासनांतर्गत येतो, याठिकाणच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पंपींग मशीन सोय करण्याबाबतीत रेल्वे प्रशासनाला पत्रद्वारे माहिती देण्याच्या सूचना संबधित विभागास आयुक्तांनी दिल्या. तसेच शासनाच्या सर्व विभागांनी आपले नियंत्रण कक्ष् कार्यान्वित करावेत. या नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून आपत्कालीन परिस्थितीमध्ये महापालिकेला सहकार्य करावे, अशी विनंती आयुक्तांनी केली.

### ■ आयुक्तांनी दिल्या सूचना

पेंधर गावामध्ये पावसाच्या पाण्याच्या निचरा योग्य प्रकारे होण्यासाठी नाल्याची व्यवस्था करणे, महापालिका हद्दीतील रस्त्यांचे पॅचवर्कचे काम पूर्ण करणे, पावसाळ्यामध्ये अंडर पासमधील पाण्याचा निचरा होणसाठी पंपीग मशीनची व्यवस्था करण्याबाबतच्या सूचना आयुक्तांनी बांधकाम विभागास दिल्या. तसेच गाढी नदी परिसरात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास तेथील नागरिकांना इतर ठिकाणी निवाऱ्याची सोय करण्यासाठी ट्रान्झिट कॅम्प तयार करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

## नालेसफाई योग्य प्रकारे करण्याबाबत निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रभाग १४ मधील नालेसफाई पावसाळयापुर्वी योग्य प्रकारे व्हावी, अशी मागणी शिवसेना विभागप्रमुख आशिष पनवेलकर यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात आशिष पनवेलकर यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क १४ मध्ये कुंभारवाडापासुन ते बंदररोडपर्यंत मोठमोठे नाले आहे त्यामुळे या ठिकाणची नालेसफाई पावसाळयापुर्वी होणे आवश्यक आहे. त्यामुळे याठिकाणची सफाई योग्य वेळेस व चांगल्या प्रकारे झाली तर पावसाळ्यामध्ये पावसाचे पाणी तुंबणार नाही. त्यामुळे प्रभाग १४ मधील नालेसफाई पावसाळयापूर्वी योग्य प्रकारे करा, अशी मागणी त्यांनी निवेदनात केली आहे.

## पनवेलमधील भाजी, मच्छी विक्रेत्यांनी कापडी पिशवी वापरण्याबाबत जनजागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील व्यापारी, कोळी बांधव, भाजी विक्रेत्यांनी आता कापडी पिशवी वापरण्याचा संकल्प केला आहे. त्यांना याबाबतचे मार्गदर्शन माजी नगरसेविका दर्शना भोईर व भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या वतीने देण्यात आले. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम राबविण्यात आला.

भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या प्लास्टिक मुक्त वसुंधरा या अभियानांतर्गत पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापारी, विक्रेत्यांची शहरातील रोझ बाजार भाजी मार्केट या ठिकाणी बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम सांगून कापडी पिशवीचा वापर करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. यासोबत स्वच्छता अभियान राबविण्याचे ठरविण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे आरोग्य अधिकारी शैलेश गायकवाड, महेंद्र भोईर, साहेबराव घुमरे, आत्माराम लवाट, भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या अध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र, प्रांत सहसचिव कमांडर दीपक जांबेकर व माजी अध्यक्ष सुबोध भिडे, आदी उपस्थित होते. यासर्वांनी उपस्थित भाजीवाले व कोळी भगिनींसोबत संवाद साधला. एकल वापर प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद करुन गिऱ्हाइकांना कापडी पिशवी वापरण्यास सक्ती करण्याचे आवाहन त्यांनी या वेळी केले.



## तळोजा वसाहतीमध्ये सर्व सोयीसुविधा देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा वसाहत आणि परिसरातील गावांची लोकसंख्या लाखांच्या आसपास आहे, मात्र या वसाहतीमध्ये प्राथमिक सुविधा नाही. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सिडको प्रशासनाने तळोजा वसाहतीला प्राध्यान्य देवून शाळा, आरोग्य केंद्र आणि अग्निशमन केंद्र सुरू करावे, अशी मागणी तळोजा वासियांकडून केली जात आहे.

सिडकोने खारघरनंतर वसवलेल्या तळोजा वसाहतीत गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये गेल्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आले आहे. तसेच गृहनिर्माण प्रकल्पापूर्वी तळोजा ते खारघर खाडी मार्गे पुल उभारणीचे काम हाती घेतल्यामुळे नागरिकांच्या नजरा तळोजा वसाहतीकडे वळल्या. तळोजा वसाहतीत नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आले असून या परिसरातील लोकसंख्या मध्ये मोठ्या प्रमाणात भर पडत आहे.

वसाहती लगत असलेल्या पेठाली, भोईरपाडा, तळोजे मजकूर आदी गावांचा विकास झाल्यामुळे परिसरात भाडेकरूंची संख्या अधिक आहे. दरम्यान, वसाहतीच्या विकासात भर पडू लागल्यामुळे याठिकाणी खाजगी शाळा, रुग्णालये बँका, शोरुम, दुकानांची भर पडत आहे, मात्र तळोजा फेज १ आणि २ तसेच परिसरातील गावे मिळून लोकसंख्या लाखांच्या घरात असूनही या विभागात शासकीय शाळा, आरोग्य केंद्र, अग्निशमन केंद्र आणि टपाल कार्यालय नाही. आरोग्य केंद्र नसल्यामुळे रहिवाशांना खासगी रुग्णालयांचा आसरा घ्यावा लागत आहे. येथील रहिवाशांना पोलीस ठाणे आणि टपाल कार्यालयातील कामांसाठी पाच किलोमीटर अंतर पार करून तळोजा औद्योगिक वसाहतीत जावे लागते. त्यामुळे प्रशासनाने शाळा, आरोग्य केंद्र आणि अग्निशमन केंद्र सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या विषयी तळोजा पोलीस ठाण्यात संपर्क केला असता तळोजा फेज १ मध्ये पोलीस चौकी कार्यरत आहे. तसेच सिडकोने तळोजा फेज १ मध्ये पोलीस ठाणेसाठी तळोजा मध्ये प्लॉट राखीव ठेवला असल्याचे सांगण्यात आले.

पाण्याच नियोजन नसताना सिडको घरे देताना २४ पाणी मिळेल असे सांगते, परंतु प्रत्यक्षात फेज १, फेज २ मध्ये पाण्यासाठी जनता हैराण आहे. सिडकोने शिर्के ग्रुपमार्फत बांधलेल्या सोसायटचांची बांधकाम निष्कृष्ट आहे. पाण्याचे नियोजन नाही. ते टॅंकरमार्फत पाणी देते तेसुद्धा कधी वेळेवर मिळत नाही. नियोजनचा आभाव असल्याचे वाटते.

१५ वर्षामध्ये सिडकोने चांगले रोड बनवले आणि लगेच रोड खोदकाम करून खराब केले. जर गॅस लाईन टाकायची होती तर रोड बनविण्याअगोदर करायला हवे होती. आज लोकांना सिडकोच्या नियोजनशुन्य अभावामुळे खूप त्रास होत आहे, असे भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांनी सांगितले.

> सिडकोने मोठ्या प्रमाणात इमारती बांधण्यास सुरुवात केली आहे. येथील पाणीपुरवठा सुरू करून नवीन इमारतींमध्ये सिडकोने पाणी आणणे महत्त्वाचे आहे. सिडको दिलेली आश्वासने पूर्ण करून पाण्यासह इतर सुविधा पुरविणे गरजेच आहे.
>
> **-प्रल्हाद केणी, जिल्हा उपाध्यक्ष, भाजप**

## पनवेलमध्ये प्लास्टिकविरोधी कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांनी गुरुवारी (दि. १८) संयुक्त प्लास्टिक विरोधी कारवाई केली. यामध्ये सुमारे ३०किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच १५ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.



केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री आणि वापरांवर बंदी करण्यात आली आहे.

प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये, तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्यांचा कारावास असणार आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात सातत्याने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिकविरोधी कारवाई करण्यात येत असते. गुरुवारी पनवेल शहरामध्ये पर्यावरण विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांच्या सूचनेनूसार पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, प्रभाग ड चे दत्ता ठाकूर व अतिक्रमण विभागातील कर्मचारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी अभिजित लोहिया यांनी पनवेल शहरातील दुकानांवरती प्लास्टिक विरोधी कारवाई केली. या कारवाईदरम्यान सुमारे ३० किलो सिंगल युज प्लॅस्टिक जमा करण्यात आले.

## कळंबोलीतील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास सुरुवात


**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली शहरातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे लवकरच खड्डेमय रस्त्यांतून सुटका होणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत. माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी याकामी प्रशासनाकडे पाठपुरावा केला असून त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

कळंबोली शहरातील सेक्टर ५ परिसरातील साईनगर ते हिंदुस्थान बँक तसेच आजूबाजूच्या अंतर्गत रस्त्यावरील नादुरुस्त असलेल्या रस्त्यावर डांबरीकरण केले जात आहे. पावसाळ्यापूर्वी होत असलेल्या या रस्त्यांच्या कामामुळे प्रवास सुसाट होण्यास मदत होणार आहे. कळंबोलीत काही ठिकाणी सुरू असलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणामुळे रस्ते खड्डेमुक्त होण्यास मदत मिळणार आहे.

संपूर्ण शहरातील रस्ते अशा प्रकारे बनवण्याची गरज आहे. कळंबोलीतील नादुरुस्त असलेल्या रस्त्यांची डागडुजी करण्याबाबत माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी वारंवार संबंधित प्रशासनाला कळवले होते. याची दखल घेत शहरामधील होत असलेल्या डांबरीकरणाबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.





## संपादकीय

# कर्नाटकातील नवे नाटक

कर्नाटकमधील विजयानंतर काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवरून जी हमरीतुमरी झाली ती बघण्याजोगी होती. एक खुर्ची आणि तिचे दोन दावेदार असे हे प्रकरण शेवटी काँग्रेस हायकमांडच्या दारी गेले. हायकमांडच्या दरबारात माजी मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांचे पारडे वजनदार ठरले आणि पक्षाच्या विजयाचे शिल्पकार डी. के. शिवकुमार यांना उपमुख्यमंत्री पदावर तडजोड करावी लागली. या दोन नेत्यांमधील खदखद गेले दोन दिवस माध्यमांमध्ये गाजत होती. काँग्रेसमधील नाराजीचे जे उघडेवागडे प्रदर्शन गेल्या दोन दिवसांत घडले, त्यापेक्षा बर्‍याच अधिक प्रमाणात नजीकच्या भविष्यकाळात बघावे लागणार आहे.

**शेजारील कर्नाटक राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये उत्साहाची लाट येणे स्वाभाविकच होते. जवळपास ३५ वर्षांनंतर काँग्रेस पक्षाला कर्नाटकात इतके नजरेत भरण्याजोगे यश प्राप्त झाले आहे. कर्नाटकमधील काँग्रेस पक्षाच्या प्रचाराची धुरा खांद्यावर घेणारे डी. के. शिवकुमार यांनी सारी प्रतिष्ठा पणाला लावून आपल्या पक्षाला विजयापर्यंत पोहचवले. ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांचे अनुभवी पाठबळ पक्षाला मिळाले. काँग्रेसचे नवे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे तर कर्नाटकचे भूमिपुत्र. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा या तिघांनीही झोकून देत कर्नाटकात प्रचार केला, पण तेथे काँग्रेसने निर्विवाद बाजी मारली हे मान्य करावेच लागेल. अर्थात त्यामागे काही कारणे आहेत. त्याची समीक्षा यथावकाश होईलही. विशेषत: कर्नाटकात कुठलेच सरकार सलग दुसर्‍यांदा निवडून येत नाही. त्या परंपरेचा फटका भाजपला यावेळी बसला. असो. नवनिर्वाचित मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांचा शपथविधी येत्या शनिवारी २० मे रोजी होईल. मुख्यमंत्री पद त्यांना आणि त्यांचे स्पर्धक नेते डी. के. शिवकुमार यांना अडीच-अडीच वर्षे वाटून घ्यावे लागेल असाही पर्याय गेल्या दोन दिवसांत चर्चिला गेला. अर्थात खुर्चीवाटपाचा हा फॉर्म्युला अखेरीस अधिकृतरित्या जाहीर झाला नसला तरी हीच खुर्चीसाठीची चढाओढ आता पाच वर्षे बघत रहावे लागणार हे वेगळे सांगावयाची गरज नाही. सत्तेच्या या खेळात कर्नाटकच्या मतदारांना दिलेली आश्वासने कुठे जाणार हे फक्त ईश्वराला ठाऊक! कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयामुळे त्या पक्षाला उत्साह वाटणे साहजिकच आहे, परंतु 'बेगाने शादी में अब्दुल्ला दिवाना' या गीताच्या ओळीनुसार महाराष्ट्रात काही नेत्यांना स्वप्नांचे पंख फुटू लागले आहेत. कनार्टकप्रमाणेच देशभरात मोदीविरोधी लाट आल्याचा भास महाविकास आघाडीच्या काही नेत्यांना दिवसाढवळ्या होऊ लागला आहे. पंतप्रधान मोदी हे देशातील बव्हंशी जनतेचे अत्यंत आवडीचे नेते आहेत. त्यांचा करिश्मा आणि कर्तृत्व याच्याशी तुलना होऊ शकणारा एकही नेता कुठल्याच पक्षाकडे नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे कर्नाटकप्रमाणेच पुढील वर्षी होणार्‍या लोकसभेच्या निवडणुकीत मोदी सरकार खाली खेचता येईल हे निव्वळ स्वप्नरंजन ठरते. आजमितीस देशातील बहुसंख्य राज्ये भाजप किंवा भाजपच्या मित्रपक्षांच्या अधिपत्याखाली आहेत. काँग्रेसप्रणित सरकारे असलेली राज्ये याच्या निम्म्यानेदेखील नाहीत, असे असताना केवळ कर्नाटकविजयाच्या जोरावर देश जिंकण्याची भाषा करणे हास्यास्पद वाटते. यंदाचे आणि पुढील वर्ष निवडणुकीच्या धामधुमीचे जाणार आहे. या दोन वर्षांमध्ये मोदीविरोधकांना योग्य तो दृष्टांत भारताचे मतदार देतील यात शंका नाही.**

# सामाजिक न्याय विभाग घर असून बेघर





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनाची इमारती बांधल्या. या विभागांतर्गत येणार्‍या सर्व विभागांची कार्यालये एकाच इमारतीत आणण्यात आली. रायगड जिल्ह्याचे सामाजिक न्याय भवगन अलिबागच्या वेशीवर असलेल्या वेश्वी ग्रामपंचायतीच्या हद्दीत गोंधळपाडा येथे बांधण्यात आले. १५ ऑगस्ट २०१४ रोजी इमारतीचे उद्‌घाटन झाले, परंतु निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या इमारतीला काही दिवसांमध्ये तडे जाऊ लागले. त्यामुळे ही इमारत रिकामी करण्यात आली.

कोट्यवधी रुपये खर्चून नबांधलेली ही इमारत सध्या वापराविना पडून आहे. विविध संस्थांकडून स्ट्रक्चरल ऑडीट केले जात आहे. त्यावर लाखो रुपये खर्च होत आहेत. सामाजिक न्याय भवन स्ट्रक्चरल ऑडीटच्या फेर्‍यात अडकल्यामुळे इमारत दुरूस्ती करावी की ती पाडून पुन्हा नव्याने बांधण्यात यावी, याचा निर्णय घेतला जात नाही. सामाजिक न्याय विभागाची सर्व कार्यालये सध्या भाड्याच्या इमारतींमध्ये सुरू आहेत. रायगड जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाची अवस्था सध्या घर असूनही बेघर अशी झाली आहे.

अनुसूचित जाती, नवबौध्द घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य विशेष सहाय्य विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला. या भवनमध्ये विविध महामंडळांची कार्यालये एकाच छताखाली सुरू करून बेरोजगारांना कर्जाच्या माध्यमातून रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. रायगड जिल्ह्यासाठी अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या इमारतीसाठी दोन कोटी ७३ लाख ९४ हजार ७०० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. इमारत बांधून १५ ऑगस्ट २०१४ रोजी इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले.

मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी तळमजल्यावर श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहीदास चर्मद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ही सहा कार्यालये तसेच पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, व सभागृह व कर्मचार्‍यांचे कार्यालय आणि दुसर्‍या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय होते, मात्र उद्‌घाटन झाल्यापासून ही दीड महिन्यामध्येच या इमारतीच्या भिंतींना भेगा पडू लागल्या. स्लॅब कोसळू लागले. लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या तज्ज्ञ पथकाने २०१९ मध्ये या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट केले. इमारत धोकादायक असल्याचे या स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये नमुद करण्यात आले होते. नव्याने इमारत बांधण्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पुन्हा इमारतीचे ऑडीट बांधकाम विभागाच्या माध्यमातून केले होते. त्यामध्ये दुरुस्त करून इमारत बांधू शकता असा अहवाल दिला होता. या दोन वेगवेगळ्या अहवालामध्ये तफावत असल्याने त्रयस्थ संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय समाजकल्याण विभागाने घेतला. त्यानुसार पवई येथील एका संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ऑडीटसाठी पुन्हा लाखो रुपये खर्च होणार आहेत. सामाजिक न्याय भवन स्ट्रक्चरल ऑडीटच्या फेर्‍यात सापडल्याने या इमारतीच्या पुर्नबांधणीची



पुनर्रबांधणीची प्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

गेल्या तीन वर्षांपासून चेंढरे येथील कच्छी भवन या ठिकाणी समाज कल्याण कार्यालय आहे. दर महिन्याला एक लाखापेक्षा अधिक रक्कम भाड्यावर खर्च होत आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय चेंढरे येथे एका बंगल्यात सुरू आहे. त्याचे भाडे द्यावे लागत आहे. अनुसूचित जाती जमाती व इतर मागास प्रवर्ग विशेष मागास प्रवर्गातील घटकाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी सामाजिक न्याय भवन बांधले, मात्र शासनाच्या विविध विभागात समन्वय नसल्यामुळे सामाजिक न्याय भवनाची इमारत बांधण्यात विलंब होत आहे. जीर्ण झालेल्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधली पाहिजे. सामाजिक न्याय विभाअंतर्गत येणारी कार्यालये सध्या वेगवेगळ्या इमारतींमध्ये आहेत. सामाजिक न्याय भवनची इमारत बांधल्या सर्व कार्यालये एकाच इमारतीमध्ये येतील. लोकांना होणारा त्रास कमी होईल.



## बदलते तंत्रज्ञान

# मस्तच! व्हॉट्सअ‍ॅपचे चॅटही करता येणार आता लॉक

जगभरात संदेश पाठविण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या व्हॉट्सअ‍ॅपने आणखी एक भन्नाट फिचर आणले आहे. याद्वारे तुम्ही कोणताही ग्रुप किंवा वैयक्तिक चॅट लॉक करू शकता. या फिचरनंतर, फक्त तुम्हीच तुमच्या चॅट्समध्ये प्रवेश करू शकाल. यासाठी तुम्हाला डिव्हाईस पिन किंवा बायोमेट्रिक्स लॉक वापरावे लागेल.

**वेगळा पासवर्ड ठेवता येणार**

* सध्या या फिचरमध्ये मोबाइल फोनची स्क्रीन लॉक करण्यासाठी जो पासवर्ड वापरला जातो, तोच वापरला जात आहे.
* मात्र यामुळे जर कोणाला मोबाइल पासवर्ड माहीत असेल तर ते तुमच्या लॉक केलेल्या चॅट्समध्ये प्रवेश करू शकतो.
* येत्या काही दिवसांत कंपनी यूजर्सला या फिचरमध्ये स्वत: पासवर्ड सेट करण्याचा पर्याय देण्याच्या तयारीत आहे.

**चॅट लॉक फिचर कसे वापरायचे?**


* या फिचरसाठी व्हॉट्सअ‍ॅपला लेटेस्ट व्हर्जनमध्ये अपडेट करा.
* यानंतर व्हॉट्सअ‍ॅप ओपन करा.
* आता तुम्हाला जे चॅट लपवायचे आहे आणि ज्याला लॉक आणि हाइड करायचे आहे त्यावर जा
* त्या चॅटच्या अकाउंटच्या प्रोफाइल पिक्चरवर टॅप करा.
* आता डिसपियरिंग मेसेजच्या खाली लिहिलेले नवीन चॅट लॉक फिचर लिहिलेले दिसेल, त्यावर क्लिक करा, त्यानंतर चॅट लॉक होईल.
* याचप्रमाणे तुम्ही इतर चॅट देखील लॉक व लपवू शकता.

**लॉक केलेली चॅट्स कशी उघडायची?**

* व्हॉट्सअ‍ॅप ओपन करा
* आता पच्या होम पेजमध्ये जे चॅट आहेत, त्याला खाली खाली स्क्रोल करा.
* यानंतर एक सिक्रेट फोल्डर दिसेल, त्याला लॉक्ड चॅट असे नाव असेल. त्यावर टॅप करा.
* आता पासवर्ड टाका किंवा फिंगरप्रिंट करा. ते केल्यानंतर चॅटमध्ये प्रवेश करू शकाल.

मेटाचे सीईओ मार्क झुकेरबर्ग यांनी फेसबुक पोस्टद्वारे या फिचरची माहिती दिली. त्यांनी सांगितले की व्हॉट्सअ‍ॅपमधील नवीन लॉक फीचर तुमचे चॅट अधिक सुरक्षित करेल. चॅट एक पासवर्ड असलेल्या फोल्डरमध्ये असतील. यामुळे, चॅटचा मजकूर दिसणार नाही.

# नाटककार, साहित्यिक विजय तेंडुलकर



**निमित्त**

विजय तेंडुलकर हे प्रसिद्ध मराठी नाटककार, लेखक, पटकथालेखक, तथा राजकीय विश्लेषक होते. त्यांचे वडील धोंडोपंत तेंडुलकर हे स्वतः लेखक, प्रकाशक आणि हौशी नट होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीतून तेंडुलकरांवर वाङ्मयीन संस्कार होत गेले. विजय तेंडुलकर यांचा आज स्मृतीदिन.

तेंडुलकरांचा जन्म कोल्हापुरात ६ जानेवारी १९२८ रोजी झाला. दि. बा. मोकाशी, वि. वि. बोकील, अनंत काणेकर, शिवरामपंत वाशीकर यांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातून तेंडुलकरांची घडवणूक होत गेली. तेंडुलकरांचे औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्या काळात जोमाने चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. साहजिकच या कालखंडात विविध विचारसरणींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांचे वास्तव्य पुण्यात आणि मुंबईत असे.

लेखनदृष्ट्या 'गृहस्थ' हे तेंडुलकरांचे पहिले नाटक. याचेच 'कावळ्यांची शाळा' या नावाने त्यांनी १९६४ साली पुनर्लेखन केले, मात्र 'श्रीमंत' हे त्यांचे रंगभूमीवरील आलेले पहिले नाटक होते. सुरुवातीच्या नाटकांपासूनच माणसाच्या जीवनाचा, त्यांच्या विकारांचा, एकारलेपणाचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. विशिष्ट तत्त्वज्ञानाचा, विचारसरणीचा ठसा नाकारून तेंडुलकर मनस्वीपणे लिहीत गेले. 'शांतता कोर्ट चालू आहे' यासारख्या नाटकातून समाजाला प्रसंगी बंडखोर वाटणार्या विषयांनाही त्यांच्या लेखणीने हात घातला. 'सखाराम बाईंडर'मध्ये हाताळलेला स्फोटक विषय आणि 'घाशीराम कोतवाल' मध्ये हाताळलेला पारंपरिक तंत्राला धक्का देणारा नाट्यबंध त्यांच्या याच प्रयोगशील जाणिवांचा अविभाज्य भाग होता. त्यामुळेच नव्या-जुन्या कलावंतांना तेंडुलकरांनी लिहिलेल्या नाटकांचे आव्हान पेलण्याची ओढ सातत्याने राहिली.

'माणूस नावाचे बेट', 'मधल्या भिंती', 'सरी गं सरी', 'एक हट्टी मुलगी', 'अशी पाखरे येती', 'गिधाडे', 'छिन्न' आदी नाटके रूढ सामाजिक संकेतांना, तसेच नाट्यसंकेतांना हादरा देणारी आणि वादग्रस्त ठरली. मानवी वृत्तीतील कुरूपता, हिंस्रता यांचे भेदक, पण वास्तववादी उग्रकठोर चित्रण असल्याने या नाट्यकृती गाजल्या. त्यावर वाद झडले आणि न्यायालयीन संघर्ष झाला. आशय आणि तंत्रदृष्ट्या असणारी विलक्षण विविधता, हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे. त्याचप्रमाणे तेंडुलकरांनी चित्रपट माध्यमही नाटकांच्याच ताकदीने हाताळले. सामना, सिंहासन, आक्रीत, उंबरठा, अर्धसत्य, आक्रोश, आघात, इत्यादी चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. स्वयंसिद्धा या दूरचित्रवाणी मालिकेचे लेखनही त्यांनी केले.

मानवी मनाचे, त्यातही त्याच्या कुरूपतेचे चित्रण करून अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे जीवन मांडताना घडते-बिघडते संबंध, त्यातील ताण, त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपण्यात त्यांची लेखणी रमते, काव्य-कारुण्य, व्यक्ती-समाज, वास्तव-फॅन्टसी यांची कलात्मक सरमिसळ त्यांच्या नाटकांत आढळते. ६०-७०च्या काळाची पार्श्वभूमी नसती तर कदाचित तेंडुलकर नावाची दंतकथा जन्मालाच नसती आली. ते दशक होतं अनादराचं आणि प्रस्थापितांविरोधात बंड पुकारण्याचं. त्यांची नाटकं त्या काळातील परिस्थितीवर भाष्य करणारी आहेत. शांतता कोर्ट चालू आहे हे नाटक ६०च्या मध्यात येणं आणि गिधाडे, घाशीराम कोतवाल आणि सखाराम बाइंडर हे ७० च्या दशकात येणं हा काही योगायोग नाही. या सर्व नाटकांमधून नात्यांचा आणि व्यवस्थेचा र्‍हास कसा होत आहे हे आपल्याला पाहायला मिळतं. अशा या वेगळी भूमिका मांडणार्‍या प्रतिभावान लेखकाचे १९ मे २००८ रोजी पुण्यात निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : शाळांना सुट्या असल्याने समुद्रकिनारे पर्यटकांनी फुललेले दिसून येतात. सायंकाळी सूर्य अस्ताला जात असताना पर्यटक समुद्रकिनारी विविध खेळांचा मनमुराद आनंद लुटत असताना तन्वी पवार यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# काजू खाण्याचे फायदे माहीत आहेत... पण तोटेही वाचा!



सुक्या मेव्याच्या बाबतीत काजूचे नाव प्रथम येते. तो स्वयंपाकघरातील एखाद्या खजिन्यापेक्षा कमी नाही. तसे काजू खाल्ल्याने हाडे मजबूत होतात. त्याचबरोबर हे खाल्ल्याने त्वचा ही निरोगी राहते. पण तुम्हाला माहित आहे का की काजूचे जास्त सेवन आरोग्यास हानी पोहचवू शकते. होय, काजूमध्ये पोषक तत्वांचे प्रमाण जास्त असल्याने काजू जास्त प्रमाणात खाणे टाळावे. काजूच्या अतिसेवनामुळे आरोग्याला कोणते तोटे होतात हे ही तुम्हाला माहिती असायला हवं.

**लठ्ठपणा वाढतो**

काजूमध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त असते. हे जास्त प्रमाणात खाल्ल्याने लठ्ठपणा, रक्तातील साखरेची उच्च पातळी यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे मधुमेह आणि थायरॉईडच्या रुग्णांनी काजू खाऊ नये. जर तुम्ही आधीच लठ्ठ असाल तर काजू खाणे टाळावे.

**किडनी स्टोन**

काजूमध्ये मॅग्नेशियम आणि कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते, त्यामुळे काजूच्या अतिसेवनामुळे किडनी स्टोनची समस्या उद्भवू शकते. अशावेळी जर तुम्हाला आधीच किडनीची समस्या असेल तर काजू टाळावे. कारण काजूचे सेवन केल्याने ही समस्या वाढू शकते.

**डिहायड्रेशन होऊ शकते**

काजूमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जास्त फायबर खाल्ल्यानंतर कमी पाणी प्यायल्यास डिहायड्रेशन होऊ शकते. कारण फायबर व्यवस्थित विरघळण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. जेव्हा शरीरात जास्त फायबर असते तेव्हा ते शरीरात असलेले पाणी शोषून घेते. यामुळे बद्धकोष्ठतेसारख्या समस्याही सुरू होतात.

**फुफ्फुसांशी संबंधित समस्या**

काजूमध्ये लोह असते. लोहाचे जास्त सेवन केल्याने पेशींच्या कामावर परिणाम होतो. लोह पेशींमध्ये साठवले जाते. जर ते फुफ्फुसांच्या पेशींमध्ये जमा झाले तर. त्यामुळे दम्याची लक्षणे दिसू शकतात. त्या व्यक्तीला श्वास घेणे कठीण होते.

**(दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# खोपोली शिळफाट्याला वाहतूक कोंडीचे ग्रहण

## स्थानिकांसह पर्यटकांची रखडपट्टी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुना राष्ट्रीय महामार्गावरील शिळफाटा खोपोली भागात रुंदीकरण रखडल्याने वाहतूक कोंडीचा नित्याची बनली आहे. त्यामुळे तासन्‌तास स्थानिकांसह पर्यटकांची रखडपट्टी होत आहे.

जुन्या मुंबई महामार्गाचे खालापूर फाटा ते खोपोली रुंदीकरणाचे काम पाच वर्षांपूर्वी सुरू झाले होते. जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले असून वर्टसिला कंपनी ते इंदिरा चौक रस्ता रुंदीकरण रखडले आहे. या भागात चार रस्ते एकत्र येत असल्यामुळे वाहतूक कोंडी नेहमी होत असते. शिळफाटा परिसर नेहमी गजबजलेला असून, बसस्थानक, पेट्रोल पंप, हॉटेल यामुळे या भागात नेहमी वाहतूक कोंडी होते विशेषता संध्याकाळी दोन ते तीन तासांची वाहतूक कोंडी ठरलेली असते.




रुंदीकरणात रस्त्याची एक मार्गिका नऊ मीटरची असताना, खोपोली फाट्यापासून गावात सात मीटरची ठेवण्यात आली होती. काही व्यावसायिकांच्या बांधकामाला धक्का लागू नये यासाठी रस्ता दोन मीटरने कमी झाल्यानंतर त्याविरोधात आवाज उठविण्यात आला होता. त्यानंतर जवळपास वर्षभर काम बंद राहिले होते.अखेर नऊ मीटरचा रस्ता करण्याचा दबाव आल्यानंतर ठेकेदाराला सात मीटरवर बांधलेली क्राँक्रिट गटार तोडून पुन्हा नव्याने नऊ मीटरवर गटारे बांधावी लागले होते.

शिळफाटा परिसरात अनेक व्यापाऱ्यांनी पुढाकार घेत पक्के बांधकाम तोडले होते जेणेकरून रस्ता रुंद होईल, परंतु रस्त्याच्या कामाला खो बसला असून शिळफाटा परिसरात इंदिरा चौकात पुन्हा अतिक्रमण वाढले आहेत.

वाहतूक कोंडीच्या समस्यातून सुटण्यासाठी वर्टसिला ते इंदिरा चौक काम लवकर मार्गी लागणे आवश्यक आहे. दरम्यान आयआरबी व रस्ते विकास महामंडळ यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## तळवली दांडवाडीत माय-लेकीचे अपहरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तळवली दांडवाडी येथे कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याची घटना माय-लेकीचे अपहरण केल्याची घटना घडली. याबाबत हरिश जाधव (वय २८) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हरिश जाधव यांची पत्नी हौसा जाधव (वय २५) व मुलगी प्रतॅक्षा जाधव (वय २) यांना पळवून नेले आहे.

हौसा जाधव रंगाने सावळी, उंची १४२ सेमी, अंगाने बारीक, कपाळावर मध्यभागी जखमेची खूण, गळ्यात मण्याची साधी गाठी, पायात पैंजण, हातात हिरव्या बांगड्या, तर मुलगी प्रतीक्षा जाधवची, उंची दोन फूट, केस बॉपकट काळे, अंगाने मजबूत आहे.

## पोलादपूरमधील पार्ले गावात टँकर उलटला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर तालुक्यात केमिकल वाहून नेणारा टँकर उलटला. हा टँकर रोहे येथील एक्सेल कंपनीतून रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे एमआयडीसीकडे जात असल्याची माहिती प्राप्त झाली.



डीटीसीएल केमिकल घेऊन रोहे येथील एक्सेल कंपनीतून खेड येथील लोटे कंपनीकडे जाणारा टँकर (एमएच ४३ वाय ५०७८) हा पोलादपूर तालुक्यातील पार्ले गावाच्या हद्दीत चौपदरीकरणाच्या रस्त्याचे संरक्षक कठडे संपतात तेथे गुरुवारी (दि. १८) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास उलटला.

उत्तरप्रदेशातील चालक विजयबहादूर अनंतभगवान यादव (वय ३४, नारायणपूर अहिमान, जि. सुलतानपूर) याने याबद्दल फिर्याद दिली आहे. या अपघाताबद्दल सहाय्यक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिरगांवकर हे अधिक तपास करीत आहेत.

## मुद्देमालासह चोरटा २४ तासांत गजाआड

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर सारसन गावच्या हद्दीत चोरी करणाऱ्या चोरट्याला खोपोली पोलिसांनी २४ तासांत मुद्देमालासह गजाआड केले आहे.


(छाया : जयवंत माडपे)

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसीम बशीर बल्लारी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फ्युजन सप्लायर ही ऑप्टिकल फायबर नेटवर्किंग जॉईन करणारी मशीन मारुती इको गाडीवरील चालकाने चोरून नेली होती, याबाबत खोपोली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला यांच्या सूचनेप्रमाणे खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार व सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळशेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अलोक खिस्मतराव, पोलीस शिपाई नुलके या पथकाने महामार्गावर घडलेल्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज तपासून गोपनीय बातमीदारामार्फत आरोपीची ओळख पटविली.

चोरी प्रकरणातील मोहम्मद जावेद हसन (रा. खारघर, नवीन मुंबई) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्हा कबूल केला. त्याचप्रमाणे गुन्ह्यात वापरलेली कार व मुद्देमाल असा ९० हजारांचा ऐवज पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

## मुरूडमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड-कुंभारवाडा सत्यम युवक मंडळाच्या वतीने सांस्कृतिक व सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन डॉ. विश्वास चव्हाण यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व दिपप्रज्वलन करून करण्यात आले.

या वेळी माजी अध्यक्ष प्रकाश चव्हाण म्हणाले की, गेली ३८ वर्षे पाखाडातील मुलांचे कौशल्य व नृत्य, खेळातील प्राविण्य वाढविण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या वेळी मंडळाचे अध्यक्ष दिपेश राजपुरकर, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे उपप्राचार्य सत्यम क्रीडा मंडळाचे अध्यक्ष डॉ. विश्वास चव्हाण, अनंत म्हसळकर, सचिव स्वप्निल म्हसळकर, उपाध्यक्ष सुमीत दर्ग, खजिनदार समिर भाटकर, अरुण म्हसळकर, प्रसन्न जाळगावकर, माजी उपाध्यक्ष दिपक राजपुरकर, महिला अध्यक्ष वृषाली चव्हाण, पुष्पा दर्ग, अमिता कोतवाल, उपाध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, युवक क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व महिला वर्ग उपस्थित होते.

डॉ. विश्वास चव्हाण यांनी, मुलामुलींनी मोबाईलचा वापर कमी करावा. जास्तीत जास्त वाचन करा जेणेकरून अभ्यासातही चांगली प्रगती वाढेल. आज मुलामुलींनी सादर केलेल्या नृत्याबद्दल मुलांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे मत व्यक्त केले.

## सैनिकांच्या विश्रामगृहासाठी सव्वा कोटींचा निधी उपलब्ध

### आमदार भरत गोगावले यांचे प्रयत्न

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सैन्यदलात शौर्य गाजविण्यासह सेवा बजाविणाऱ्या आजी-माजी सैनिकांच्या विश्रामगृहाच्या जीर्ण अवस्थेमुळे होणारी गैरसोय लक्षात घेऊन महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी राज्यसरकारच्या माध्यमातून पोलादपूर येथील विश्रामगृहाच्या नूतनीकरणासाठी तब्बल सव्वा कोटींचा निधी उपलब्ध केला आहे.

पोलादपूर तहसील कार्यालयालगत सैनिक विश्रामगृह असून या इमारतीची दूरवस्था वाढत असल्याने माजी सैनिकांची मोठया प्रमाणात तालुक्याच्या शहरात आल्यावर गैरसोय होत असल्याने आजी-माजी सैनिक सेवा कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून अध्यक्ष वाय. सी. जाधव, उपाध्यक्ष नामदेव उतेकर, सचिव परशुराम दरेकर, खजिनदार श्रीकांत पवार, सल्लागार श्रीपत जगदाळे व दत्ताराम मोरे यांनी आमदार गोगावले यांच्याकडे पाठपुरावा केला. आमदार गोगावले यांनी राज्य सरकारकडून भरीव निधीची तरतूद करून आणली असून लवकरच या विश्रामगृहाचे भूमिपूजन आयोजित करण्यात येणार असल्याचे आजी-माजी सैनिक सेवा कल्याणकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रतिनिधीस सांगितले.

आमदार भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. २०) कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये माजी सैनिक आणि वीरपत्नींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला असून कर्नल किशोर मोरे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या वेळी माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, लेफ्टनंट कर्नल राहुल माने, प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, सहायक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सुभेदार गोविंदराव साळुंखे, प्रभारी तहसीलदार समीर देसाई, नगराध्यक्षा सोनाली गायकवाड, सहाय्यक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर, गटविकास अधिकारी धनंजय जगताप, नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे उपस्थित राहणार आहेत.

## राजपुरीत आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून मॉकड्रिल




**आज राजपुरी-जंजिरा किल्ला येथे घेण्यात आलेले मॉकड्रिल पूर्णपणे यशस्वी झाले. सर्व सुरक्षा यंत्रणा वेळेवर पोहचल्या. भविष्यात अशी परिस्थिती उद्‌भवल्यास आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा नक्कीच वेळेवर पोहचू शकतील, असा विश्वास वाटतो.**

**-प्रकाश सकपाळ, पोलीस निरीक्षक, मुरुड-जंजिरा**

**मुरुड : प्रतिनिधी**

राजपुरी जेट्टी येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, राजपुरी बंदर व पोलीस विभाग, मुरूड पोलीस ठाणेमार्फत मॉकड्रिल आयोजित करण्यात आले.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या संकल्पनेतून तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (राजपूरी बंदरे समूह) प्रादेशिक बंदर अधिकारी सी. जे. लेपांडे, मुरूड तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांचे मार्गदर्शनानुसार राजपुरी जेट्टी येथून जंजिरा किल्ला येथे प्रवाशांना घेवून जाणारी शिडाची नौका लक्ष्मी सह प्रवासमार्गात पलटी होवून दुर्घटना घडलेली आहे. या बोटीतील ३० प्रवासी समुद्रात पडले आहेत. त्यांना वाचवण्याकरीता मदतीची आवश्यकता आहे. अशा प्रसंगाचे मॉकड्रिल करण्यात आले.

यामध्ये पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक खोत, माने, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घरत, सचिन वाणी, पोलीस नाईक सागर रोहेकर, झावरे, एस. जे.रसाळ, श्रीमती वारिक सहभागी झाले होते. विविध सरकारी कार्यालयाचे कार्यालय प्रमुख, कर्मचारी, मच्छिमार सोसायटी, कोळी बांधव, सागर रक्षक दल, लाईफ गार्ड व प्रवासी वाहतूक संस्था, रेस्क्यू बोट, पोलीस स्पीड बोट यांना मदतीसाठी सतर्क करण्यात आले. सुरक्षा यंत्रणांची तारांबळ उडाली अन् सर्व यंत्रणा वेळेवर पोहचल्याने मॉकड्रिल यशस्वी झाल्याचा प्रत्यय आला.

## प्रत्येक घटकापर्यंत शासकीय योजना पोहचविण्याचे आवाहन

**चौक** : शासन आपल्या दारी, शासकीय योजनांची जत्रा या अनुषंगाने नऊ योजनांचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळाला पाहिजे, अशा पद्धतीने ग्रामविकास विभागाचे काम अपेक्षित आहे, असे आवाहन खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सी. एस. राजपूत यांनी केले.

एकाच ठिकाणी ग्रामस्थांना विविध योजनांचा लाभ कमीत कमी कालावधीत देण्याच्या हेतूने शासनाने शासकिय योजनांची जत्रा हे अभियान राबविण्याचा संकल्प केला आहे. त्यानिमित्ताने संबंधित योजनेचे खातेप्रमुख, ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, कृषी विभागाची बैठक झाली. त्या वेळी गटविकास अधिकारी बोलत होते. योजनांच्या अंमलबजावणीाठी विस्तार अधिकारी महादेव शिंदे, शैलेंद्र तांडेल व सर्व कर्मचारी मेहनत घेत आहेत.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification:

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-10/ 23-24 **7000027331** | Work of Supply Erection Testing and Commissioning of 1X100KV HV and 1X22KV LV Bay along with Civil Works on Turnkey Basis at 100kV Patalganga S/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 96.70 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost **Submission of Bids:** From 17.05.2023 to 24.05.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 25.05.2023 @ 10:00 Hrs. **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**


## नागोठण्यात आज शनिजयंती उत्सव

**नागोठणे** : शहरात शनिजयंती उत्सवाचे आयोजन शुक्रवारी (दि. १९) श्री जोगेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले आहे. दरवर्षी नागोठणे शहरात श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसरात शनिदेवाची जयंती मोठ्या भक्तीभावात, उत्साहात भक्तांच्या उपस्थित साजरी केली जाते. संध्याकाळी ६.३० वाजता शनिदेवांची विधिवत स्थापना होईल. त्यानंतर ७ वाजल्यापासून सर्व भक्तांना शनिदेवाचे दर्शन घेण्याचा सोहळा साजरा होईल.



या वेळी सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९ वाजता शनिदेव महाराजांची महाआरती सर्व भक्तांच्या उपस्थित होईल. महाआरतीने उत्सवाची सांगता होईल. या सोहळ्याचा लाभ सर्व भक्तांनी, ग्रामस्थांनी घ्यावा असे आवाहन श्री शनि सेवा समितीचे सेवक दिनेश परमार व सेवा समिती सदस्य यांनी केले आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १९/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... महाड औद्योगिक क्षेत्रात पाणीपुरवठा योजनेकरीता डिजिटल वायरलेस फ्लो मॉनिटरिंग प्रणालीचा पुरवठा करणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ ३९,८८,०००.०० |
| २. | महाड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड येथील अशुद्ध व शुद्ध जलवाहिनीवरील फूल बोअर इलेक्ट्रो मॅग्नेटिक फ्लो मीटरची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १५,४१,२६६.०० |
| ३. | महाड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील गळती ऑनलाइन पद्धतीने हार्ड रॉक ट्रीटमेंट वापरून रोखणे. | ₹ ४०,२५,६४३.०० |
| ४. | महाड, पोलादपूर आणि रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... ट्रान्सफॉर्मर ऑईलचे फिल्टरेशन करण्यासह किरकोळ दुरुस्ती करणे. | ₹ ६,४६,११०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०५/२०२३ ते दिनांक ०२/०६/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २३/०५/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/०५/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**जाहीर नोटिस**

ह्या जाहीर नोटीसव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे पिरकोन, ता. उरण, जि. रायगड खाली नमुद केलेल्या वर्णनाची मिळकत ही १. हिरा रूपेश कोंडिलकर २. लिलाबाई रमेश पाटील ३. जितेंद्र मधूकर पाटील ४. बेबीबाई मधूकर पाटील ५. वैभव मधूकर पाटील आणि ६. सरीता प्रदिप पाटील यांच्या मालकीची आहे.

| अनु क्र. | मौजे | गटक्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे. आर. चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | पिरकोन | १३१ /२ | ०-६६-५० पो.खं. ०-०८-१० एकुण ०-७४-६० | ७.३१ |

वर नमुद मिळकती ह्या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असून सदरची मिळकत आमचे अशीलांनी कायम खरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणताही प्रकारे हक्क हित संबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. वरील मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
ॲडव्होकेट,
९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस.,सातरहाटी, उरण, ता. उरण,
फोन नं. ८८७९१४१२३२

# ‘थ्री आर’साठी नवी मुंबई पालिका सज्ज



## स्वच्छतेसंदर्भात केंद्र सरकारची संकल्पना

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारने २१ दिवस चॅलेंज हा अभिनव उपक्रम १५ मे ते ५ जून या कालावधीत राबविण्याचे जाहीर केले असून यामध्ये थ्री आर ही मुख्य संकल्पना आहे. थ्री आर अर्थात-कचरा कमी करणे (रेड्यूस), कचऱ्याचा पुनर्वापर करणे (रियूज) व कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करणे (रिसायकल) असून या उपक्रमांतर्गत शहरामध्ये ‘थ्री आर’ सेंटर्स सुरू करणे व नागरिकांच्या सहयोगातून विविध उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. यातील विशेष बाब म्हणजे स्वच्छतेविषयी जागरुक असणाऱ्या नवी मुंबई महापालिकेने याविषयीच्या कार्यवाहीला आधीपासूनच सुरुवात केलेली आहे असे सांगत नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी ‘२१ डेज चॅलेंज’साठी नवी मुंबई महानगरपालिका नागरिकांसह सज्ज असल्याचे सांगितले.

महापालिका मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये आयोजित विशेष समारंभात ‘२१ डेज चॅलेंज’ अंतर्गत ‘थ्री आर’ उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी उपस्थितांशी थेट संवाद साधला. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपायुक्त नितीन नार्वेकर, शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, शिक्षण विभागाचे उपायुक्त अनंत जाधव, महापालिका सचिव श चित्रा बाविस्कर, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिकेने ‘थ्री आर सेंटर्स’ ही संकल्पना यापूर्वीच शहरातील विविध विभागात ९२ ठिकाणी राबविण्यास सुरुवात केली असून ‘नको असेल ते द्या व हवे असेल ते घ्या’ या संकल्पनेवर आधारित या सेंटर्सना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या सुरु असलेल्या सेंटर्सच्या कार्यप्रणालीमध्ये जाणवलेल्या काही त्रुटी दूर करून उपक्रम कालावधीत ही सेंटर्स अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार असल्याचे आयुक्तांनी या वेळी स्पष्ट केले.बिसलरी कंपनीसोबत ‘बॉटल फॉर चेंज’ हा अभिनव उपक्रम, ‘एच अॅन्ड एम’ व काही इतर इंटरनॅशनल ब्रँडसोबत जुने कपडे घेऊन ग्राहकांना नवीन कपडे खरेदी करताना किंमतीवर सवलतीच्या रुपात पॉईंट्स देण्याची अभिनव संकल्पना मागील काही वर्षांपासून नवी मुंबईत यशस्वीपणे राबविली जात असल्याचेही ते म्हणाले.

सर्वांत महत्वाचे म्हणजे झोपडपट्ट्यांमधील कचऱ्याचे संकलन करून त्याची तेथेच विल्हेवाट लावणारा ‘झिरो वेस्ट स्लम मॉडेल’ हा प्रकल्प ५ झोपडपट्ट्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर राबविला जात असून त्याची इतर झोपडपट्ट्यांमध्ये व गावठाण भागात अंमलबजावणी करण्यात येत असल्याचेही आयुक्तांनी या वेळी सांगितले. या संकल्पनेस राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

### सर्वच शाळांमध्ये उपक्रम राबविण्याचे नियोजन

*‘थ्री आर’चे महत्व नव्या पिढीत अर्थात विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी नवी मुंबई महापालिका आधीपासूनच कृतीशील असून त्यादृष्टीने ‘ड्राय वेस्ट बँक’सारखा अभिनव उपक्रम शाळांमध्ये राबविला जात आहे. सध्या बेलापूर विभागातील सहा शाळांमध्ये हा उपक्रम प्रायोगिक स्वरुपात राबविण्यास सुरुवात झालेली असून या उपक्रमास विद्यार्थी व पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. यापुढील काळात हा उपक्रम सर्वच शाळांमध्ये राबविण्याचे नियोजन करण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले.*

**माझे जीवन, माझे स्वच्छ शहर हे घोषवाक्य घेऊन केंद्र सरकारमार्फत २१ डेज चॅलेंज -थ्री आर हा उपक्रम जाहीर केला, मात्र हा उपक्रम जाहीर करण्यापूर्वीपासूनच नवी मुंबई महापालिकेमार्फत त्या दृष्टीने अनुषांगिक कार्यवाही केली जात असून यामध्ये नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळत आहे. त्यामुळे १५ मे ते ५ जून या कालावधीत थ्री आर उपक्रमाच्या अनुषंगाने आपण सर्व नवी मुंबईकर मिळून सर्वोत्तम कामगिरी करूया.**

**-राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# कामोठे येथून आठ बांगलादेशींना अटक



## बेकायदेशीर वास्तव्यप्रकरणी पोलिसांची कारवाई

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील एका चाळीत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशींवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये चार महिला आणि चार पुरुषांचा समावेश असून ते २२ ते ४८ वयोगटातील आरोपी आहेत. ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने केली आहे.

इरशाद मुल्ली, जनुअल इस्लम, अनिउल आलम, कोकन शेख, पिंकी इस्लम, शोभा बेगम शेख, कविता शेख, रेशमा मूल, असे यातील आरोपींची नावे आहेत. कामोठे सेक्टर २२ येथील एम. जी. एम. रुग्णालयाच्या पाठीमागील मोकळ्या जागेत उभ्या असलेल्या एका चाळीत मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी नागरिक राहत असून त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा व्हिसा नसल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी या ठिकाणी एक पथक रवाना केले. त्यावेळी तेथे राहणाऱ्या लोकांकडे विचारपूस करीत भारतीय नागरिकत्वाची कागदपत्रांची पाहणी केली असता हे आरोपी आढळून आले. या आरोपींकडे भारतीय असल्याचा कुठलाच पुरावा नव्हता. तसेच आरोपींनी स्वतः बांगलादेशी असून रोजगारासाठी या देशात बेकायदेशीर घुसखोरी केल्याची कबुलीही दिली आहे. या सर्व आरोपींवर पारपत्र नियमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांनी दिली.

## निवडक

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल :** भरधाव कारची दुचाकीला धडक बसल्याने ५० वर्षीय व्यक्ती जखमी झाल्याची घटना चिंचपाडा ब्रीजजवळील सर्व्हिस रोडवर घडली आहे. या प्रकरणी कारचालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आदिवासी कातकरी पाडा, पंचशीलनगर येथील राजेंद्र सोनवणे हे दुचाकीने बहिणीला भेटण्यासाठी करंजाडे येथे येत होते. ते चिंचपाडा ब्रीजजवळील सर्व्हिस रोडवर आले असता पाठीमागून आलेल्या कारची मोटरसायकलला पाठीमागून ठोकर बसली. या अपघातात सोनवणे खाली पडले व ते जखमी झाले. त्यांच्या डाव्या पायाला तीन ठिकाणी फ्रॅक्चर असल्याचे सांगितले. याप्रकरणी कारचालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### प्रवाशाचा मोबाईल लंपास

**पनवेल :** रेल्वेस्थानकात झोपी गेलेल्या प्रवाशाने पोटावर ठेवलेला मोबाइल अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना पनवेल स्थानकात घडली. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वप्निल पहिलवान हा पहाटेच्या सुमारास मुंबईतून पनवेलला जात असताना पनवेल स्थानकात त्याला झोप लागली. यामुळे मोबाइल पोटावर धरूनच तो झोपला होता. यादरम्यान अज्ञात चोरट्याने त्याचा मोबाइल चोरून धूम ठोकली. थोड्या वेळाने त्याला जाग आल्यानंतर मोबाइल मिळून आला नाही. याबाबत स्वप्नीलने पनवेल रेल्वे ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### नेरेपाडा येथे गायींची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील नेरेपाडा येथे तीन गायींची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील नेरेपाडा येथील रोहिदास भगत यांनी दोन गायी गोठ्यात बांधल्या होत्या. सकाळी ते गायी पाहण्यासाठी गेले असता त्यांना त्या दिसल्या नाहीत. तसेच वामन खुटले हेदेखील त्यांची गाय बांधलेल्या ठिकाणी पाहायला गेले असता ती दिसून आली नाही. त्यांनी गायींचा परिसरात शोध घेतला, मात्र त्या सापडून आल्या नाहीत. त्यामुळे अज्ञात चोरट्याने या तिन्ही गाई चोरून नेल्या आहेत. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर चार परिसरात राहणाऱ्या एका ४९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून चोरटे पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. भुवनेश्वरी नारायणन (वय ४९) या झेरॉक्स काढण्यासाठी सेक्टर ४ नवीन पनवेल परिसरात गेल्या होत्या. या वेळी अचानक स्कूटीवर दोन व्यक्ती आले. त्यांनी त्यांची सोन्याची चेन ओढून ते पळून गेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# नवी मुंबईतील वंडर्स पार्क खुले करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईचे आकर्षक असलेल्या नेरूळ येथील वंडर पार्कचे उद्घाटन अद्याप झालेली नाही. त्यामुळे नागरिकांकडून वंडर पार्क खुले करण्यासंदर्भात मागणी होत आहे.



नेरूळ येथील वंडर्स पार्क नवी मुंबई शहरातील लँडमार्क असून, नवी मुंबई शहराबरोबरच उरण, पनवेल, ठाणे मुंबई या शहरातील अबाल वृद्धांचे महत्त्वाचे प्रेक्षणीय ठिकाण आहे. सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या पार्कमध्ये विविध दुरुस्तीची, तसेच नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या आकर्षक खेळांची व्यवस्था सज्ज आहे.

कोरोनाकाळापासून जवळजवळ अडीच वर्षांपेक्षा अधिक काळ सर्वसामान्यांसाठी हे पार्क बंद आहे. त्यामुळे हे पार्क कधी सुरू होणार याची उत्सुकता शाळांना सुटी लागलेल्या बच्चेकंपनीसह पालकांना आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अडीच वर्षांपासून बंदच असलेले हे पार्क महाराष्ट्र दिनाच्या शुभ मुहूर्तावर पुन्हा गजबजणार का, याची चर्चा त्यावेळी शहरात सुरू झाली होती. अनेक दिवसांपासून वंडर्स पार्कला आवश्यक असणाऱ्या सबस्टेशनचे विद्युत विभागाचे काम पूर्ण झाले असल्याची माहितीही महापालिकेकडून त्यावेळी देण्यात आली होती. आता महाराष्ट्र दिनाचा मुहूर्त हुकल्यामुळे पार्क कधी गजबजणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नेरूळमधील वंडर्स पार्कला नेहमीच मोठी गर्दी पाहायला मिळते. या उद्यानात नवी मुंबईसह ठाणे, खारघर, उरण, पनवेल येथून टॉय ट्रेन, तसेच विविध खेळण्यांची मजा घेण्यासाठी नागरिक येतात. आता पार्कमधील खेळण्यांमध्येही वाढ करण्यात आली आहे. त्यातच मुलांना लागलेल्या सुट्ट्यांमुळे नव्याने सुरू होणाऱ्या वंडर्स पार्कची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे. बच्चेकंपनीसाठी आकर्षण असलेले हे पार्क सुरू करण्यासाठी पालकांची मागणी वाढू लागली आहे.

आगामी काळात मुंबईतील नेहरू सायन्स सेंटरप्रमाणे नवी मुंबईतील विज्ञान केंद्रही नावारुपाला येईल, असे काम याच पार्कशेजारी वेगाने सुरू आहे.

वंडर पार्कचे काम पूर्ण होऊनही उदघाटन रखडले आहे. याबाबत नवी मुंबईकरांच्या तक्रारी प्राप्त होत असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून सांगण्यात आले. त्या अनुषंगाने वंडर पार्कचे महापालिकेने लवकरात लवकर उद्घाटन करून हे पार्क सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले करावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेनेही महापालिका आयुक्तांना निवेदनातून केली आहे.

# नवी मुंबईत मुकाभिनय कार्यशाळेला दिव्यांग व सर्वसाधारण मुलांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

माइम अर्थात मुकाभिनय ही अभिनयातील पायाभूत गोष्ट असून एकही शब्द न उच्चारता कलावंताला आपले म्हणणे केवळ चेहऱ्यावरील हावभावांव्दारे, शारीरिक हालचालींव्दारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवायचे असते. या दृष्टीने सर्वसाधारण मुलांसोबत दिव्यांग मुलांना एकत्र आणून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या माध्यमातून संकल्प फाऊंडेशन व नवी मुंबईतील प्रारंभ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली आठ दिवसीय मुकाभिनय कार्यशाळा अकादमीच्या सभागृहात अत्यंत उत्साहात झाली.



या वेळी मुलांनी सादर केलेल्या ‘बियाँड द साऊंड’ या विनोदी मुकाभिनीत दीर्घांकाला सुप्रसिध्द नाट्य, चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक श्री. विजय पाटकर यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित नाट्यरसिकांनी प्रचंड दाद दिली. नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाचे पदवीधर नाट्यदिग्दर्शक व नाट्यगुरू शिवदास घोडके यांनी या कार्यशाळेत सहभागी मुलांना मुकाभिनयाचे धडे दिले तसेच त्यांच्याकडून दीर्घनाट्य करून घेतले.

या वेळी प्रमुख अतिथी नाट्य अभिनेते विजय पाटकर, विजय शिक्षण संस्थेचे सचिव संजय रहाळकर आणि नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे प्राध्यापक सुरेश शेट्टी, प्रारंभ फाऊंडेशन नवी मुंबईचे विश्वस्त अभय अवसक यांच्या हस्ते शिबिरार्थींना प्रशस्ती पत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्या अवसक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यशाळेत प्रगती कर्णबधीर विद्यालय येथील आठ मुले - मुली सर्वसाधारण मुलांसह सहभागी झाले होते. यानिमित्त आम्हीही इतर मुलांसोबत एकत्र येऊन काही उत्तम करू शकतो असा आत्मविश्वास दिव्यांग मुलांमध्ये निर्माण झाल्याची प्रचिती आल्याचे कार्यशाळा संचालक शिवदास घोडके यांनी सांगितले. एनएसडी पदवीधारक नाट्यगुरू शिवदास घोडके यांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, संकल्प फाउंडेशन व प्रारंभ फाउंडेशन, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ही सर्वसमावेशक मुकाभिनय कार्यशाळा घेतली. त्यातही विशेषत्वाने दिव्यांग कलावंतांचा समावेश करून एक उत्तम संदेशही दिला आहे.

# एपीएमसीत जुन्नर हापूस दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजारात सध्या कोकण, कर्नाटक हापूस आंबा दाखल होत आहे, मात्र कोकणातील हंगाम मे अखेरपर्यंत असून एपीएमसीत आता जुन्नर हापूस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. बाजारात एक हजार ते १५०० बॉक्स आवक होत असून दोन ते अडीच डझनला ८०० ते १५०० रुपये दर आहे.

यावर्षी बाजारात कोकणचा हापूस अवकाळी पावसाने टप्याटप्याने दाखल न होता एकदम दाखल झाला. त्यामुळे हापूसाच्या ऐन हंगामात एप्रिल-मेमध्ये हापूस आवक रोडावली. जुन्नर हापूस दरवर्षी बाजारात मे अखेरपर्यंत येत असतो. सध्या बाजारात जुन्नर हापूस दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. जुन्नर हापूस आंब्याला ही अवकाळी पावसाचा फटका बसल्याने यंदा केवळ ४० टक्के उत्पादन असणार आहे. त्यामुळे हा हंगाम १५ जूनपर्यंत महिनाभर सुरू असेल, असे मत व्यापारी संजय पिंपळे यांनी व्यक्त केले आहे.

# ज्येष्ठ नागरिक संघात अनंत कथा कविता कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर येथे बुधवारी (दि. १७) ज्येष्ठ नागरिक संघटना मुलुंड येथील अनंत जोशी आणि उर्मिला जोशी उभयतांनी अनंत कथा आणि कविता कार्यक्रम संघांच्या साप्ताहिक सभेमध्ये सादर केला.

या वेळी उभयतांचा सत्कार संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर व माधुरी गोसावी यांनी केला. यावेळी संघाचे सचिव सुनील खेडेकर उपस्थित होते. या वेळी एक अजब वाडाही भयकथा व गूढकथा अनंत जोशी यांनी कथन केली. भुताटकीने पछाडलेला हा वाडा या कथेने वातावरण काहीसे गंभीर झाले होते, पण हलक्या फुलक्या विनोदी कवितांनी वातावरण पुन्हा हसते खेळते झाले. ’नाही व्हायचे वेगळे मला, आवराआवर, ठरवलंय आता, राहूनच गेलं, या सारख्या जेष्टाच्या भावविश्वाला हात घालणाऱ्या जवळजवळ १५कविता त्यांनी सादर केल्या.

उर्मिला जोशी यांनी कथा कवितांचा पट उलगडून दाखविला. त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला बहुसंख्य स्त्री पुरुष सभासद उपस्थित होते.

# आगोटसाठी खवय्यांचा सुकी मच्छी खरेदीकडे कल

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यापूर्वी खवय्यांचा सुकी मच्छी खरेदी करण्याकडे कल वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे सुकी मच्छी खरेदी करण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत गर्दी होत आहे.

ग्रामीण भागात पावसाळ्यासाठी सुकी मच्छी साठवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते. प्रजनन काळात ओल्या मच्छीला बंदी असते अशावेळी ओली मच्छी मिळत नसल्याने ग्रामीण भागातील मांसाहारी वर्ग सुक्या मच्छीला अधिक पसंती देतात. यामुळे सुकट, मांदेली, बारीक जवळा, अंबाडी, वाकटी माकली, ढोमकी, बोंबील, बांगडा यांची मागणी वाढली असून, ही सर्व सुकी मच्छी खरेदी करण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत गर्दी होत आहे.



# कोकण भवनात बायोमेट्रिक हजेरी प्रणाली कार्यान्वित

**नवी मुंबई : बातमीदार**

सरकारने सर्व कार्यालयात बायोमेट्रिक हजेरी प्रणाली अनिवार्य केलेली आहे. यासाठी अलर्ट सिटिझन फोरमने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून कोकण भवनात कर्मचारी, अधिकाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी सुरू करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाने बायोमेट्रिक मशिन्स बसवल्या व सर्व कर्मचारी-अधिकाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी नोंदवण्याचे आदेश पारित केले. त्यानुसार



१ मेपासून बायोमेट्रिक हजेरी सुरू झालेली आहे. अलर्ट सिटिझन्सच्या वतीने मंगळवारी (दि. १६) सामान्य प्रशासन उपायुक्त मनोज रानडे, तहसीलदार श्वेता पवार आणि शासकीय माहिती अधिकारी माधुरी डोंगरे यांची सदिच्छा भेट घेतली व तुळशीचे रोप भेट देत आभार व्यक्त केले. फोरमच्या वतीने मोहन वस्त, अरुण कागले, रमेश देशमुख, मोहन जाधव व सुधीर दाणी हे उपस्थित होते.

# मुरुडमधील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या लवकरच सोडविणार

## अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांचे आश्वासन

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड तालुक्यामधील जेएसडब्ल्यू साळाव कंपनीने येथील चेहेर, नवीन चेहेर, साळाव, मिठेखार, निडी, वाघूळवाडी परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीत अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न व मागण्या ऐकून घेतल्यानंतर ३० मेपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये पुढची बैठक लावण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या समस्या लवकरच सोडविण्यात येतील, असे आश्वासन दिले.

बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिर्के, प्रांत अधिकारी प्रशांत ढगे, मुरूड तहसीलदार रोहन शिंदे, शेतकऱ्यांचे कायदेशीर प्रतिनिधी म्हणून रायगड भूषण संतोष ठाकूर, ॲड. सिद्धार्थ इंगळे, ॲड. विनायक शेडगे, अजय चवरकर व १५० शेतकरी उपस्थित होते.

मुरूड तालुक्यात जेएसडब्ल्यू कंपनीने परिसरातील शेतकऱ्यांसोबत केलेल्या सामंजस्य कराराचे उल्लंघन केल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी २८ एप्रिलला शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांना निवेदन दिले होते. शेतकऱ्यांच्या जमिनी सिकॉमकरिता महाराष्ट्र शासनाने भूसंपादन करून भाडेपट्ट्याने १९८९मध्ये ग्रासिम इंडस्ट्रीज यांचा विक्रम इस्पात हा प्रकल्प वेलस्पन मॅक्सस्टील लिमिटेड यांनी विकत घेतला होता. त्यानंतर हा कारखाना जेएसडब्ल्यू कंपनीने अधिग्रहित केला, परंतु सुरुवातीला वेलस्पन मॅक्सस्टील लिमिटेड व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये २०१०साली सामजंस्य करार करण्यात आला होता, मात्र कारखानदाराने या करारामध्ये नमूद सर्व अटींचे वारंवार उल्लंघन करीत शेतकऱ्यांवर अन्याय केला असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्त शेतकरी करीत आहेत. ६०० एकर जागा संपादित करणे बाकी असून कंपनी नोकरीच्या बदल्यात तटपुंजे सानुग्रह रक्कम देण्याची घाई करीत असून त्याला सर्व शेतकऱ्यांचा विरोध आहे, असेही बैठकीत सांगण्यात आले.

जर मे महिन्याच्या शेवटपर्यंत या विषयावर निर्णय झाला नाही तर शेतकरी आपल्या अधिग्रहित केलेल्या जमिनीवर पुन्हा ताबा मिळवून शेती कसण्यास सुरुवात करतील, असा इशारा या वेळी देण्यात आला.

यानंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न व मागण्या ऐकून घेतल्यानंतर ३० मेपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या उपस्थितीमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. या बैठकीला जेएसडब्ल्यूच्या वतीने निर्णय घेण्याची क्षमता असणारे अधिकाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य केली जाईल, असे आश्वासन दिले.

या वेळी शेतकऱ्यांच्या वतीने राम सुतार, जितेंद्र गायकर, मंगेश गायकर, जनार्दन चवरकर, अरुण रोटकर, कुसुम मुंबईकर, दीपक नथुराम रोटकर आणि राजेंद्र सुतार आदी उपस्थित होते.

## निवडक

### वाडगावमध्ये आधार नोंदणी शिबिर



**रेवदंडा** : रायगडचा युवक फाउंडेशन आणि वाडगाव ग्रामपंचायतीतर्फे आणि भारतीय पोस्ट रायगड विभाग अलिबाग यांच्या सौजन्याने बुधवारी (दि.१७) आधार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आधार नोंदणी शिबिरास अधीक्षक पोस्ट रायगड यांनी निलेश पाटील, सुग्रीव टोंगारे यांची नेमणूक करण्यात आली. या शिबिराला आदिवासी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### डाटा एन्ट्री ऑपरेटर्ससाठी निविदा जाहीर

**अलिबाग** : जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार बाह्ययंत्रणेमार्फत १९ डाटा एन्ट्री ऑपरेटर्सची सेवा कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन घेण्याची असून त्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर शुक्रवारी (दि. १२) निविदा जाहिरात प्रसिद्ध करण्यात आले आहे. इच्छुकांनी न्यायालय व्यवस्थापक, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा न्यायालय व्यवस्थापक महेश दायमा यांनी केले आहे.

### सापडलेली सोनसाखळी केली परत

**मुरूड** : शहरातील दत्तवाडी येथील रहिवासी असणारे संदेश वाळंज यांनी त्यांना सापडलेली सोन्याची चेन पोलीस स्टेशनमध्ये जमा केल्याने त्यांच्या प्रामाणिकपणाचे



कौतुक होत आहे. संदेश वाळंज अलिबाग तहसीलदार कार्यालयात शिपाई पदावर कार्यरत आहेत. ऑफीसमधल्या काही झेराक्स काढण्यासाठी जात असताना दुपारच्या दरम्यान त्यांना वेधशाळेजवळ रस्त्यावर सोन्याची चेन दिसली. त्यांनी काही नागरिकांना विचारणा केली, परंतु चैनीचा मालक न सापडल्याने संदेश वाळंज यांनी अलिबाग पोलीस ठाण्यात जाऊन रितसर माहिती सांगून चेन सहायक पोलीस निरीक्षक दत्ता जाधव यांच्याकडे जमा केली. पोलिसांनी संदेश वाळंज यांच्या प्रमाणिकपणाचे या वेळी कौतुक केले.

## सलोखा योजनेमुळे सौहार्द वाढेल -नैराळे

**चौक : प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्यासाठी सलोखा योजना आणली असून या योजनेमुळे गावकी भावकीत सौख्य, सलोखा आणि सौहार्द वाढेल. त्यामुळे या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अजित नैराळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने ही योजना ३ जानेवारी २०२३पासून राज्यात लागू केली आहे. या योजनेत आपली जमीन दुसऱ्याच्या ताब्यात व दुसऱ्याच्या ताब्यातील ती जमीन पुन्हा घेण्यासाठी म्हणजे जमिनीची अदला-बदल करण्यासाठी मुद्रांक शुल्क एक हजार व नोंदणी शुल्क एक हजार भरल्यावर आपापली जमीन नावावर होईल. यामुळे गावागावात होणारे, भावकीत होणारे तंटे मिटविण्यासठी या योजनेचा फायदा होणार आहे.

अशी अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात दाखल आहेत. अशा प्रकरणांचा निप टारा होण्यास वेळ लागणार नाही. ही अट शेत जमिनीसाठी आहे, मात्र हे करीत असताना ७/१२ सदरी ज्यांची नावे आहेत त्यांनी संमती दर्शवली पाहिजे. यासाठी संबंधित शेतकरी यांनी आपले गावचे मंडळ अधिकारी व गाव कामगार तलाठी यांच्याशी संपर्क साधला पाहिजे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अजित नैराले व खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर व कौशल्य जागृती शिबिर उत्साहात

**पेण : रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून औद्योगिक प्रशिक्षण संस्था व कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून पेणमध्ये छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करियर व कौशल्य जागृती शिबिराचे आयोजन गुरुवारी (दि. १८) करण्यात आले होते.

या शिबिरात १० वी, १२वीनंतर विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या विषयावर करण्यात आले. मुख्य मार्गदर्शक डॉ. विजय कोकणे यांनी कृतज्ञतेची भावनानिर्मिती सकारात्मक करिअरच घडवण्यास प्रेरक होत आहेत असे मत व्यक्त केले. उपस्थितांना स्मिता शिपुरकर, के. व्ही. पाटील, प्रीती संदानशिव, सायली सुभाने यांचेदेखील मार्गदर्शन ऐकावयास मिळाले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी आमदार रविशेठ पाटील, जेएसडब्ल्यूचे एव्हीपी अध्यक्ष अध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण म्हात्रे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एन. के. चौधरी, पेण आयटीआय प्राचार्य विद्या पाटील, समाजसेविका मुस्कन झटाम, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुकन्या नांदगावकर, हिमांशू भालकर व स्वयंसेवक उपस्थित होते.



# मारुती फाउंडेशनतर्फे पुस्तकपेढी योजनेचा शुभारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**



शालेय शिक्षण घेणाऱ्या इ. नववी ते १२वीमधील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहाय्यभूत व्हावे या हेतूने सुरू करण्यात आलेल्या मारुती फाउंडेशनच्या पुस्तकपेढी योजनेचा बुधवारी (दि. १७) पेण तळे येथे शुभारंभ करण्यात आला. पुस्तकपेढी योजनेचे हे चौथे वर्ष असून यावर्षी फाउंडेशनच्या माध्यमातून पुस्तकांबरोबर विविध शैक्षणिक साहित्याची मदत गरजूंना देण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत शैक्षणिक मदत व्हावी हा उद्देश समोर ठेवून इ. नववी ते १२वीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षभरासाठी पूर्णपणे मोफत पाठ्यपुस्तक संच भेट दिला जातो. वर्षभर संच वापरल्यानंतर फाउंडेशनकडे परत केला जातो. त्यामुळे विद्यार्थी-पालकांना वेळेत पुस्तके मिळतात व खरेदी करण्याचा आर्थिक भार हलका होत आहे. गेल्या तीन वर्षात १४०हून अधिक विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. पेण तळे येथे गावाचे उपाध्यक्ष सीताराम पोटले, सामाजिक कार्यकर्ते राजेश भावे, भागोजी पोटले, अनिल निंगावले, विनायक पोटले, काशिराम कालप, प्रवीण पोटले व फाउंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे यांच्या हस्ते या योजनेचा या शैक्षणिक वर्षातील शुभारंभ करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्त्या अनुया आपटे, निर्धार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेश अहिरे, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उभारे, किशोर वेदपाठक, भालचंद्र खाडे, शंकर शिंदे आदी मान्यवरांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या या योजनेसाठी फाउंडेशनचे आधारस्तंभ बाळाराम मांडवकर, सुमित मोंडे, दीपक ठाकूर यांचे मोलाचे योगदान व मार्गदर्शन लाभत आहे. या वर्षी या योजनेतून १७५ विद्यार्थी शैक्षणिक मदतीचा लाभ घेतील असा विश्वास फाउंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे यांनी व्यक्त केला आहे.

## कर्जत, खालापुरातील धरणे आणि धबधब्यांवर बंदी न घालण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत, खालापूर तालुक्यात प्रसिद्ध असलेली धरणे व धबधबे ही पर्यटकांची सहलीसाठी पसंतीची ठिकाणे आहेत. प्रशासनाने गेल्या काही वर्षांपासून सुरक्षेच्या कारणास्तव सर्व धबधबे व धरणांवर पर्यटकांसाठी बंदी घालण्यात येते. खरे तर यानिमित्ताने स्थानिकांच्या व्यवसायास चालना मिळते व अनेकांना यातून काही प्रमाणात रोजगार प्राप्त होतो. त्यामुळे कर्जत, खालापूर तालुक्यातील धरणे व धबधब्यावर बंदी न घालण्यासंदर्भात प्रशासनास निवेदन देण्यात आले.

धरणे व धबधबे या ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन करून तेथील स्थानिक प्रशासनास याची जबाबदारी द्यावी, धबधबे व धरण या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था तैनात करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या वेळी पत्र आपचे खालापूर तालुकाध्यक्ष डॉ. शेखर जांभळे आणि त्यांचे सहकाऱ्यांनी कर्जतचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे व खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना देण्यात आले.



## मेढा येथे संयुक्त जयंती महोत्सव

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील मेढा येथील सांची बुद्धविहार येथे तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन शनिवारी (दि. २०) करण्यात आले आहे.

या जयंती महोत्सवात पंचशिल ध्वजारोहण, धम्मवंदना, सुत्र पठण, अतिथींचे स्वागत, सन्मान सोहळा, प्रबोधन सभा, आभार प्रदर्शन व स्नेहभोजन तर सायंकाळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमास राज्य सचिव चंद्रकांत मोरे, ज्येष्ठ समाज नेते यशवंत शिंदे, कोकण नेते वि. के. जाधव, आर.एस. मोरे, रघुनाथ मोहिते, चैतन्य कर्णिक, अनिकेत मोहिते, सुनील मोरे, सरपंच स्नेहा खैरे आदी उपस्थित राहणार आहेत.

## श्रीवर्धन येथे आजपासून मल्टिमीडिया प्रदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, प्रादेशिक कार्यालय पुणे व राज्य शासनाचे विविध विभाग तसेच नगरपरिषद श्रीवर्धन यांच्या सहकार्याने श्रीवर्धन येथील समुद्रकिनाऱ्यावर १९ ते २१ मेदरम्यान आंतरराष्ट्रीय भरड धान्य (पौष्टिक तृणधान्य) वर्षानिमित्त मल्टिमीडिया प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार असून या वेळी श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी, तहसीलदार महेंद्र वाकळेकर, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, नगर परिषद मुख्याधिकारी विराज लबडे, पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे, तालुका कृषी अधिकारी डी. एल. कुंभार, तालुका क्रीडाधिकारी संदीप वांजळे, बालविकास सेवा अधिकारी श्रीमती अमिता भायदे, नगर परिषद अभियंता प्रणय ठाकूर, क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये, सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी पी. कुमार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नागरिकांसाठी या वेळी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून यावेळी शासनाच्या विविध योजना तसेत पौष्टिक तृणधान्यांची माहिती देण्यासाठी विविध शासकीय विभागांतर्फे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुले असून या प्रदर्शास सर्व नागरिक तसेच पर्यटकांनी भेटी द्याव्यात, असे आवाहन केंद्र व राज्य शासनाच्या तसेच श्रीवर्धन नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.



# पेण खारेपाटात उन्हाळी भातशेती बहरली

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या निर्मितीमुळे खारेपाटातील शेती ओलिताखाली आली आहे. ५२ गावांतील ६,६६८ हेक्टर शेतजमीन ओलिताखाली आणून जिरायती शेतीच रुपांतर बागायती शेतीमध्ये करणे हा शासनाचा आहे. या उन्हाळ्यात हेटवणे सिंचनाच्या पाण्यावर लागवड केलेली शेती परिपक्व होऊन पिक काढणीसाठी शेतकरी गुंतला आहे.

पेणमधील पूर्व दिशेला हेटवणे मध्यम प्रकल्प आहे. सध्या धरणाची एकूण पाणी पातळी ८३ मीटर इतकी आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. सिंचनासाठी पाणी आरक्षित करून पूर्वीच ठेवले आहे. ८८ दशलक्ष घनमीटर सिंचनाचे पाणी शेतीसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. ते आता ५० दशलक्ष घनमीटरवर आले आहे. तब्बल ६,६६८ हेक्टर क्षेत्रावरील भातशेती व ५२ गावांचा हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समावेश करण्यात आला आहे.


यापैकी १९ किमीपर्यंतच कालव्याचे पाण्यावर १७०० ते १८०० एकर भातशेती केली जाते. सध्या पीक पूर्णपणे तयार झाले आहे व शेतकरी कापणीला आलेली पिके काढण्यासाठी तयारीत गुंतला आहे. हेटवणे धरण प्रकल्पालगत असलेल्या कामार्ली, आधरणे, तळवली, सापोली, बोरगाव, शेणे, रोडे काश्मीरे, या ओलिताखालील गावांच्या हद्दीतील शेतजमिनीत शेतकरीवर्ग रब्बी हंगामात उन्हाळ्यात भातशेती, भाजीपाला शेती, फुलशेती व थोड्या प्रमाणात कलिंगडशेती करून १७०० एकरावर रब्बी हंगामात पीक घेतले जाते.

मुबलक सिंचनाचे पाणी, भरपूर सुर्यप्रकाश व खतांची मात्रा यामुळे ऊत्पन्नाच गणित सोपे सुलभ होते. जरबेरा फुलशेती, नाचणी, वरी, सूर्यफूल, झेंडू, मोगरा, रताळी, वेलवर्गीय भाज्या, भाजीपाला, शेतीपूरक संेद्रीय भातशेती मोठ्या प्रमाणात केली जाते. याशिवाय जिते गावातील शेतकरी उन्हाळी सिडको जलशद्धीकरण केंद्राचे पाणी भातशेतीसाठी उपयोगात आणून २००एकरावर लागवड करीत आहेत.



माणगाव : नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भाजपचे राजेश मेहता यांचे त्यांच्या पत्नी माजी उपनगराध्यक्ष निलम मेहता, मुलगी मोहिनी, मुलगा पंकज व सून सेजल यांनी अभिनंदन केले. (छाया : सलीम शेख)

# दिल्लीचा विजय; पंजाब प्ले ऑफबाहेर



**धर्मशाला : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये बुधवारी झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्जवर १५ धावांनी विजय मिळवला. यासोबतच दिल्ली संघ प्ले ऑफच्या शर्यतीतून बाहेर झाला आहे.

पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या दिल्लीच्या फलंदाजांनी पंजाबच्या गोलंदाजांचा समाचार घेत २० षटकांत २ विकेट्स गमावत २१३ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यानंतर या धावांचा पाठलाग करणाऱ्या पंजाबने या सामन्यात विजय मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अथर्व तायडे आणि लियाम लिविंगस्टोनच्या वादळी अर्धशतकानंतरही पंजाबला २० षटकांत १९८ धावाच करता आल्या. त्यामुळे दिल्लीने या सामन्यात पंजाबवर १५ धावांनी विजय मिळवला.

पंजाबसाठी सलामीला उतरलेल्या प्रभसिमरन सिंगने १९ चेंडूंत २२ धावांची खेळी केली. तो अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. कर्णधार शिखर धवनला तर इशांत शर्माने भोपळाही फोडू दिला नाही. पहिल्या चेंडूवर धवन बाद होऊन तंबूत परतला. त्यानंतर अथर्व तायडे आणि लियाम लिविंगस्टोनने दिल्लीच्या गोलंदाजांना धुव्वा उडवला आणि अर्धशतकी खेळी केली. तायडेने ४२ चेंडूंत ५ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीनं ५५ धावांची खेळी साकारली, तर लिविंगस्टोनने ४८ चेंडूंत ९ षटकार आणि ५ चौकारांच्या मदतीनं ९४ धावा कुटल्या, परंतु त्याला पंजाब किंग्ज संघाला विजय मिळवून देण्यात अपयश आलं. दिल्लीसाठी इशान शर्मा आणि नॉर्कियाने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या, तर खलील अहमद आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी, दिल्लीसाठी कर्णधार डेव्हिड वॉर्नरने ३१ चेंडूंत ४६ धावा कुटल्या. सुर गवसलेल्या पृथ्वी शॉनेही धडाकेबाज फलंदाजी करीत ३८ चेंडूंत ५४ धावांची अर्धशतकी खेळी केली. रायली रोसोने पंजाबच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवत ३७ चेंडूंत ८७ धावा कुटल्या, तर फिल सॉल्टने १४ चेंडूंत २६ धावांची नाबाद खेळी साकारली. पंजाब किंग्जसाठी सॅम करनने भेदक मारा करून वॉर्नर आणि पृथ्वी शॉला बाद करून दिल्लीला मोठा धक्का दिला, पण रोसोने चौफेर फटकेबाजी करण्याचा धडाका सुरूच ठेवला. त्यामुळे दिल्लीच्या धावसंख्येचा आलेख उंचावला होता.



## राष्ट्रीय ज्युनिअर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अमृता भगतला कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तामिळनाडू येथील कुट्रालम या ठिकाणी राष्ट्रीय सब ज्युनिअर आणि ज्युनिअर (मुले/मुली) इक्वीप पॉवरलिफ्टिंग स्पर्धा झाली. या स्पर्धेत ज्युनियर ४७ किलो वजनी गटात रायगडच्या कर्जतमधील शेलू येथील अमृता ज्ञानेश्वर भगत हिने महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिग संघातर्फे भाग घेऊन कांस्यपदक प्राप्त केले आहे. तिने एकूण २९२.५ किलो वजन उचलले.

याशिवाय ८४ किलो वजनी गटात खोपोलीची प्रणाली आनंद माने (केएमसी कॉलेज) सहभागी झाली होती. तिने २५० किलो वजन उचलून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे.

रायगडच्या खेळाडूंच्या कामगिरीबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सेक्रेटरी, आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांनी समाधान व्यक्त केले आहे.

स्पर्धेत अमृता भगत हिला रायगडचे खेळाडू विक्रांत गायकवाड, सुरज धिमल आणि प्रणाली माने हिला क्रीडाप्रेमी विश्वनाथ माने यांचे मोलाचे सहकार्य झाले.

पॉवरलिफ्टींग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीष वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल, सुभाष टेंबे, माधव पंडित, संदीप पाटकर, दत्तात्रय मोरे, श्रीनिवास भाट, मानस कुंटे या पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा वाढदिवस गुरुवारी (दि. १८) मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या अंतर्गत अधिराज सामाजिक विकास मंडळ, साईनाथ मित्र मंडळाच्या माध्यमातून आणि पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या आयोजनातून भव्य कॅरम, बुद्धिबळ स्पर्धा मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणेश मंदिरामध्ये आणि बॅडमिंटन स्पर्धेचे तालुका क्रीडा संकुलात आयोजन करण्यात आले आहे.





कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धेचे उद्योजक राजू गुप्ते यांच्या हस्ते, तर बॅडमिंटन स्पर्धेचे उद्योजक राजेश म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, अदिराज मंडळाचे खजिनदार प्रशांत कर्पे, सुमित झुंझारराव, किशोर बाबरे, प्रवीण भोसले, कॅरम कोच अतिष कल्याणकर, बॅडमिंटन कोच डॉ. मिलिंद घरत, संतोष लवंगे, सुनील गुरव, सचिन नाईक, अर्पिता मोकल, सचिन खैरे, अदिराज सामाजिक मंडळाचे सल्लागार आकाश भाटी, पदाधिकारी, कार्यकर्ते व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# ज्युनिअर क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन

## सलामीच्या लढतीत पनवेलची उरणवर मात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील भेंडखळ क्रिकेट असोसिएशन (बीसीए) आयोजित १२ वर्षाखालील मुलांच्या लेदर क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला असून सलामीच्या लढतीत प्रतीक क्रिकेट अकादमी पनवेल संघाने युसीएसए उरण संघावर मात करीत विजय प्राप्त केला.

रायगड जिल्ह्यातील नामांकित सहा संघांचा सहभाग असलेली ३५ षटकांची ही स्पर्धा दोन गटांत खेळली जात आहे. पहिल्या सामन्यात उरणच्या युसीएसए संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रतीक क्रिकेट अकादमी पनवेल संघाच्या इशांत पाठकच्या फिरकी गोलंदाजीसमोर उरणचा संघ १२० धावांवर गडगडला. इशांतने ३० धावांत पाच बळी टिपले. अजिंक्य कैयाने तीन बळी घेत त्याला साथ केली. उरण संघाकडून ओम कोळीने सर्वाधिक ४३, तर आर्यन निकाळजेने ३० धावा केल्या.



प्रत्युत्तरात पनवेल संघाने १२१ धावांचे लक्ष्य तीन गड्यांच्या मोबदल्यात २० षटकांत सहज पार करत विजय संपादन केला. यात कर्णधार वेदांत बोंबले ३७ याने, तर इशांत पाठकने १४ धावांचे योगदान दिले. पनवेल संघाचा अष्टपैलू खेळाडू इशांत पाठकला सामनावीर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

> **संपूर्ण स्पर्धा जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियमांनुसार खेळवली जाणार असून मुलांमध्ये नेतृत्व क्षमता वाढीस लागावी, त्यांना मोकळेपणाने खेळ करता यावा यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत.**
> **–नयन कट्टा, मुख्य प्रशिक्षक, बीसीए भेंडखळ**

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन भेंडखळ ग्रामपंचायतीच्या सरपंच मंजिता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपसरपंच संगीता भगत, ग्रामपंचायत सदस्य शीतल ठाकूर, अभिजित ठाकूर, अजित ठाकूर, लिलेश्वर भगत, किरीट पाटील, भेंडखळ क्रिकेट अकादमीचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष मनोज भगत, भूषण ठाकूर मुख्य प्रशिक्षक नयन कट्टा, स्पर्धेचे पंच ॲड. पंकज पंडित, आयोजक शरद म्हात्रे, विशाल ठाकूर यांच्यासह रूपेश पाटील, अमित पाटील, राजाराम मोकल, दत्तात्रेय ठाकूर, निलेश घरत, संदीप ठाकूर, हसुराम भोईर आदी उपस्थिती होते.

स्पर्धेतील विजेत्या संघाला स्व. रुपम (आर. आर) पाटील स्मृती करंडक देऊन सन्मानित केले जाणार आहे, तर उपविजेत्या संघाला आकर्षक करंडक तसेच सामनावीर, मालिकावीर, स्पर्धेतील उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज, क्षेत्ररक्षक, प्रत्येक सामन्यातील उदयोन्मुख खेळाडूला आकर्षक चषक देण्यात येणार आहेत.






**पनवेल : समाजसेवेबरोबरच क्रीडा क्षेत्राला महत्त्व देणारे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत कामोठ्यात युवा वॉरियर्स कबड्डी लीग ही विद्युत प्रकाशझोतातील स्पर्धा दोन दिवस खेळली गेली. या स्पर्धेच्या प्रारंभी जपान विरुद्ध पनवेल या प्रेक्षणीय सामन्याने रंगत आणली.**

## लखनऊच्या अडचणी वाढल्या!

### केएल राहुलपाठोपाठ कृणाल पांड्यालाही दुखापत



**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये लखनऊ सुपरजायंट्सने आपल्या होमपिचवर मुंबई इंडियन्सवर विजय मिळविला. या सामन्यादरम्यान लखनऊ संघाचा कर्णधार कृणाल पांड्या ४९ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला.

कृणाल पांड्या क्रीजवर सेट झाला होता. ४९ धावा केल्यानंतर खेळत होता आणि मोठा डाव खेळू शकला असता, पण त्याने तंबूत परतण्याचा निर्णय घेतला. कुणालने १६व्या षटकानंतर मैदान सोडले. त्याला धावताना काही त्रास होत होता.

एकना स्टेडियमच्या खेळपट्टीवर फिरकी गोलंदाजांना मदत मिळत आहे. खेळपट्टीच्या संथपणामुळे येथे शॉट्स खेळणे सोपे नाही. अशा स्थितीत कृणाल चेंडूसहही महत्त्वाचे अस्त्र ठरेल. जर तो अर्धशतकासाठी थांबला असता आणि क्रॅम्प वाढला असता तर त्याला गोलंदाजी करता आली नसती. त्याने पहिल्याच षटकात आपल्या संघासाठी गोलंदाजीही केली.

## पदकप्राप्त खेळाडू आणि क्रीडा मार्गदर्शकांना पारितोषिकाची रक्कम बँक खात्यात होणार जमा

**अलिबाग : प्रतिनिधी**

गुजरात राज्यात झालेल्या ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे ८०० खेळाडू, व्यवस्थापक, तांत्रिक अधिकारी, मार्गदर्शक इ.चमू सहभागी झाले होते. पदकप्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली रोख पारितोषिकाची रक्कम सर्व संबंधिताच्या बँक खात्यात जमा करण्यास मंत्री, क्रीडा व युवक कल्याण महोदयांनी मान्यता दिली असून मंजूर रोख पारितोषिकाची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही संचालनालयास्तरावर प्राधान्याने सुरू आहे, असे क्रीडा व युवक सेवा सहसंचालक चंद्रकांत कांबळे यांनी कळविले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करून पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडाविषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाडूंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभूत सुविधा, खेळाडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची या बाबी विचारात घेऊन क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी तसेच राज्याचे नाव उज्वल करून पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना रोख बक्षीस देऊन गौरविण्याची योजना संचालनालयस्तरावर कार्यान्वित असून त्या अंतर्गत २७ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत गुजरात राज्यात झालेल्या ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ३४ खेळ प्रकारात महाराष्ट्र राज्याचे ८०० खेळाडू, व्यवस्थापक, तांत्रिक अधिकारी, मार्गदर्शक इ.चमू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत राज्यातील खेळाडूंनी खेळानुसार ३९ सुवर्णपदक, ३८ रौप्यपदक व ६३ कांस्यपदक असे एकूण १४० पदके प्राप्त केली असून पदकतालिकेत देशात दुसरा क्रमांक संपादन केला आहे, परंतु स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व राज्यांचा विचार करता महाराष्ट्र राज्य हे पदक तालिकेत प्रथम स्थानी आहे.

सन २०१५ या वर्षी केरळ येथे झालेल्या ३५व्या नॅशनल गेम्स स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्यपदकासाठी अनुक्रमे पाच लाख, तीन लाख व १ लाख ५० हजार रोख पारितोषिक रक्कम देऊन गौरविण्यात आले आहे.

या स्पर्धेतील पदकप्राप्त खेळाडूंच्या रोख पारितोषिक रकमेत मुख्यमंत्री महोदयांनी वाढ करून पदक प्राप्त खेळाडूंना रोख पारितोषिकाची रक्कम जाहीर केली आहे. खेळाडू व मार्गदर्शक यांच्या रोख पारितोषिकासाठी एकूण रक्कम २०३६.७० लाख शासनाकडून प्राप्त झाली आहे.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत संपादन केलेले पदक व रोख पारितोषिके रक्कम ही सुवर्णपदक खेळाडू सात लाख व मार्गदर्शक ५० हजार रुपये, रौप्यपदक खेळाडू पाच लाख व मार्गदर्शक ३० हजार रुपये. कांस्यपदक खेळाडू तीन लाख व मार्गदर्शक २० हजार रुपये अशी आहे.

पदकप्राप्त खेळाडू व त्यांचे क्रीडा मार्गदर्शक यांना शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली रोख पारितोषिकाची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात जमा करण्यास क्रीडा व युवक कल्याण मंत्री महोदयांनी मान्यता दिली असून मंजूर रोख पारितोषिकाची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही संचालनालयास्तरावर प्राधान्याने सुरू आहे, अशी माहिती देण्यात आली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com